# चैतन्य लहरी

मार्च / एप्रिल २००४ अंक क . ३ / ४









## ॥ श्री शिवपूजा, पुणे: फेब्रुवारी २००४ ॥









## ॥ होळी पूजा प्रतिष्ठान पुणे: ६ मार्च २००४ ॥





# अनुक्रमणिका

■ ........होआवे जी. ---------------------------------------- २

■ शिवपूजा, पुणे १५ फेब्रुवारी २००४ ---------------------------- ३

■ प्रतिष्ठान : लग्नाचा वाढदिवस व होळी पूजा २००४---------------- ४

■ प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे प्रवचन; इंग्लंड, ९ जुलै ८२ ------------ ५

■ कव्वाली कार्यक्रम; प्रतिष्ठान, पुणे २० एप्रिल २००४ ---------------- ८

■ श्री गणपत्यथर्वशीर्ष ---------------------------------------- ९

■ श्री शिवपूजा, पुणे फेब्रुवारी २००४ वृत्तांत -------------------- ११

■ निर्मल इन्फोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजी कंपनी आणि
वनदेवी मशिन द्घाटन कार्यक्रम १५ एप्रिल, २००४ --------------- १६

■ वाढदिवस समारंभ: वृत्तांत, दिल्ली मार्च २००४ ------------------ १७

■ स्वत:ला ओळखा श्रीमाताजींचे प्रवचन ------------------------- १९

■ सहज समाचार ------------------------------------------ २३

■ सहजयोग सेमिनार (कार्यशाळा) निगडी पुणे ------------------- २४

सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, दिनांक १६ एप्रिल २००४ पासून सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींच्या फोटोंची विक्री, कॅलेंडर, चैतन्य लहरी,युवाहष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य हे ''निर्मल इंन्फ्रोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणें'' या कंपनी मार्फत संपूर्ण भारतभर वितरण व विक्री होणार आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,निर्मल इंन्फ्रोसिस्टीमस ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरिल साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री करु नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहिल. तसेच चैतन्य लहरी मासिकाचे नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD." या नावाने पाठवावा. सदर कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. BEHIND HOTEL GRACE,
GROUND FLOOR, PAUD ROAD, KOTHRUD,
PUNE 411 029. TEL. 020 25286537

# ........होआवे जी.

आजकालची सामाजिक, शैक्षणिक, राजकीय इ. परिस्थिति पाहिली तर दिवसेंदिवस ती अधिक समस्याप्रधान बनत चालली आहे असे जाणवते. वेगवेगळ्या प्रकारे परिस्थिति सुधारण्याचे प्रयत्न होत आहेत. पण परिस्थितीच्या रेटयापुढें त्यांचा प्रभाव फिका पडत असावा असे वाटते; विशेषत: काळाबरोबर या समस्या अधिकाधिक गंभीर व व्यापक होत चालल्या आहेत आणि परिस्थिति दु:खदायक पण तितकीच चिंताजनक होत आहे म्हणून. या समस्येवर एकमेव उपाय म्हणजे माणूस 'माणूस' म्हणून आंतून बदलला पाहिजे, त्याच्या अंतरंगात परिवर्तन घडले पाहिजे. सहजयोग नेमके हेच घडवण्याचा मार्ग आहे.

सत्ता व पैसा, आणि चारित्र्य व नीतिमत्ता यांच्यामधील सीमारेषा नेहमीच धूसर व अस्पष्ट असतात. म्हणूनच माणसाला आज या अंधारी व काटेरी रस्त्यावरुन मार्गक्रमण करतांना प्रकाशाची गरज आहे. सहजयोगाद्धारे कुण्डलिनीच्या जागरणामधून हा प्रकाश सहज व सर्वांना प्राप्त होणारा आहे, किंबहुना तो नेहमींच सत्य दाखवणारा व कल्याणकारक आहे. या प्रकाशाची कास धरणे हाच आजकालच्या परिस्थितीत राजमार्ग आहे. हा प्रकाश जितका दूरवर व प्रकर्षाने पसरेल तितकी परिस्थिति सुधारणार आहे.

हीच नेमकी सहजयोग्यांची आद्य जबाबदारी आहे हे श्रीमाताजी अनेक वेळां आवर्जून सांगत आहेत. तसेच सहजयोगी जितके प्रगल्भ होतील तितके आपल्याला मिळालेल्या सहज-साक्षात्काराचे मोल काय आहे हे आपल्या लक्षांत येईल.वृक्षाची मुळें जितकी खोल जातात तितक्या त्याच्या फांद्या आजूबाजूला पसरत जातात व फळें धरली की त्या जमिनीकडे वळतात. या निसर्गतत्त्वाचे उदाहरणही श्रीमाताजींनी दिले आहे. हेच ध्येय आपण सदैव डोळ्यासमोर ठेवले पाहिजे.

नुकत्याच झालेल्या पूजें त '' कैवल्य'' या स्थितीबद्दल बोलताना "You must rise, you must reach and you must know That State"अशा आशयगर्भ शब्दात श्रीमाताजींनी आपल्या छोट्याशा प्रवचनांत उपदेश केला आहे. त्यांच्याच कृपाशीर्वादाने संत ज्ञानदेवांचे शब्दांतील ''होआवे जी'' ही स्थिति मिळवण्याचा आपण प्रयत्न करत राहू या.

• • •




# श्री शिवपूजा पुणे

प.पू श्रीमाताजी निर्मलादेवींचेभाषण

१५ फेब्रुवारी २००४

सहजयोग्यांनी कैवल्य'स्थिती पर्यंत उन्नत व्हायला पाहिजे.



आज आपण महान गुरुची पूजा करण्यासाठी इथें एकत्र आलो आहोत. सर्व देव-देवतांचा हा महान गुरू कोण, या महान शक्तीचे स्वरूप काय आहे व ती कशी सर्वत्र संचारित होत राहते हे आपण नीट जाणले पाहिजे. हे गुरुतत्त्व म्हणजेच साक्षात् शिव, शिवशक्ति म्हणजेच गुरूशक्ति. ही गुरु-शक्ति मिळाल्यावर तुम्ही स्वत:च स्वत:चे गुरु होता.

या शक्तीचे एकमेव कार्य व उद्देश म्हणजे कल्याण. ज्याला या शक्तीचे आशीर्वाद मिळतात त्याचे सर्व प्रकारे कल्याणच होते, सर्व प्रकारची सफलता मिळते; एवढेच नव्हे तर त्याचे जीवनच प्लावित व अलंकृत होते. मानवाचे संपूर्ण कल्याण आत्मसाक्षात्कार मिळण्यामधूनच होणार ; आत्मसाक्षात्काराशिवाय कल्याण संभवत नाहीं. आत्मसाक्षात्कारानंतरच मानवाला सर्व सुख खऱ्या अर्थानें मिळत असते; त्याच्या जीवनालाच तेज येते; पण त्याहीपेक्षां मोठे आशीर्वाद म्हणजे तो पूर्णार्थानें समाधानी होतो. समाधान हे त्याला मिळणारे वरदानच म्हटले पाहिजे आणि त्या समाधानांत तो रममाण होतो.

अशा कल्याणामधून तुमची सर्व शारीरिक व मानसिक संकटे आणि क्लेश दूर होत असतात. किंबहुना आजार येणें म्हणजे खरे कल्याण अजून होत नाहीं असे समजावे. तसेच सांसारिक सर्व अडचणी व समस्या पण दूर होतात. कुण्डलिनी सहस्रारात आल्यावर सर्व देवांचे देव म्हणजे महादेव ही कल्याणकारी शक्ती उपलब्ध होते आणि मानव संतुलनांत येऊन खऱ्या शांतीचा अनुभव घेतो.

त्यासाठींच आपण या गुरूला शरण गेले पाहिजे; त्यांनंतर मग कांहीं मागायचे उरतच नाहीं आणि सर्व कांहीं मिळाले अशी श्रध्दा तयार होते; त्यांतूनच तुम्हाला प्रेमाची शक्ति प्राप्त होते, किंबहुना ही प्रेमशक्ति तुम्हाला कवटाळते आणि तुम्ही रोमांचित होऊन जाता. ही शक्ति मिळवण्याचा प्रयत्न तुम्ही करायला हवा.

ज्याने ही शिवशक्ति प्राप्त केली आहे अशा गुरूकडूनच ती तुम्हाला मिळूं शकते आणि तुम्हालाही गुरुपद मिळते. मग तुमचे सारे भौतिक, मानसिक व शारीरिक प्रश्न नाहींसे होतात. हेच त्या शक्तीचे आशीर्वाद असतात हे लक्षांत घ्या. आणखी एक आशीर्वाद म्हणजे तुम्ही स्वत: गुरूपदावर आरुढ झालात की हेच आशीर्वाद तुम्ही इतरांनाही मिळवून देत राहता आणि त्यातून आणखी नवे गुरु तयार होतात.

ही कल्याणकारक शक्ति मिळालेला मानव अत्यंत समाधानी असतो, त्याला बाकी कसल्या इच्छाच होत नाहींत. हीच शिवशक्ति आहे. स्वत: शिवदेखील ध्यानांतच शांतपणे बसलेले आहेत. हा आत्मसाक्षात्काराचाच प्रसाद आहे पण तो देणाराही त्या उच्च स्थितीला पोचलेला सिध्द असावा लागतो. हे गुरुपद मिळवण्यासाठी तुम्हाला वेगळे असे कांहीं करावे लागत नाहीं, ध्यानस्थितीमधें प्रगत व प्रगल्भ होत स्थिरावल्यावर ही परिपक्वता सहज प्राप्त होते. मग तुम्ही कांहीं मागतही नाहीं; तुमच्या फक्त सान्निध्यांत येणाऱ्यालाही समाधान व शांति मिळते.

हीच स्वर्गसुखाची शांति व आनंद आहे. म्हणूनच त्याला '' कैवल्य'' स्थिति म्हणतात. सहजयोगात तुम्ही अधिकाधिक प्रगल्भ होत या स्थितीला उन्नत होऊन पोचले पाहिजे आणि त्यांत स्थिरावले पाहिजे. तुमच्या जवळ ही क्षमता आहे. या स्थितीला येण्याचाच ध्यास घ्या.

सर्वांना अनंत आशिर्वाद.

## प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवी व सर सी.पी.श्रीवास्तव साहेब यांचा लग्नाचा वाढदिवस समारंभ, ७ एप्रिल, २००४ प्रतिष्ठान पुणे

सर्व सहजयोग्यांच्या भाग्याने प्रतिष्ठानवर श्रीमाताजींच्या लग्नाचा वाढदिवस समारंभ अत्यंत कौटुंबिक वातावरणात पार पडला. रात्री १०.०० च्या सुमारास टेपवर सनईची मंगल धून लावलेली होती. आदिशक्तीचे शयनकक्ष फुलांनी व कापडाच्या डेकोरेशनने सजविलेली होती. सर्वत्र आकर्षक फुलांचे मोठमोठे बुके ठेवलेले होते. तसेच फुलांच्या माळा लावलेल्या होत्या. दारावर कापडाचे सुंदर तोरण लावलेले होते. उपस्थितांनी श्रीमाताजींच्या कक्षेत प्रवेश केला त्यावेळी श्रीमाताजींचे व पापाजींचे अत्यंत प्रसन्न, प्रेमळ दर्शन सर्वांना झाले. त्यानंतर जगातील सर्व सहजयोग्यांच्या वतीने श्रीमाताजींच्या चरणावर श्री नलगीरकर व श्री राजेंद्र पुगालिया यांनी गुलाबपुष्पाचा हार आर्पण केला. तसेच पापाजींना श्री पराग राजे यांनी बुके अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजींना श्री नलगीरकरांनी दोन कॅन्डल स्टॅन्ड प्रेझेंट दिले. तसेच श्री पुगालिया यांनी चांदीचे मोठे तबक प्रेझेंट दिले.

श्री राजेंद्र पुगालिया यांनी दोन केक श्रीमाताजी व सर.सी.पी.श्रीवास्तवसाहेब यांच्या समोर मांडले. त्यानंतर श्रीमाताजींनी व पापाजींनी केक कापून सर्वांना आशीर्वादीत केले.त्यानंतर श्रीमाताजींच्या नातेवाईकांनी आणलेले प्रेझेट अर्पण केले. लहान मुलांनी सजविलेली श्रीमाताजी व पापाजींचा फोटो असलेली पालखी चरणासमोर ठेवली त्यावेळी श्रीमाताजींनी व पापाजींनी कौतुकाने त्यांना आशीर्वादीत केले.शेवटी श्रीमाताजींना महाप्रसादाचे तबक सादर केले, श्रीमाताजींनी प्रसाद चैतन्यमय केला. आज प.पू.श्रीमाताजी व पापाजी अत्यंत प्रसन्न व आनंदी होते.

●●●

## होळी पूजा प्रतिष्ठान, पुणे, ६ मार्च २००४

सर्व सहजयोग्यांच्या भाग्याने होळीच्या दिवशी संध्याकाळी प.पू.श्रीमाताजींची अल्प पुजा पार पडली. साधारण संध्याकाळी ७.०० च्या सुमारास श्रीमाताजीं व साहेब त्यांच्या दालनात बसले होते. श्रीमाताजींच्या चरणावर श्री राजेंद्र पुगालिया व श्री पराग राजे यांनी हार अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजींना श्री राजेंद्र पुगालिया यांनी सुवासिक अत्तर लावले. तसेच त्यांच्या पुढे सजविलेले सर्व रंग असलेले तबक सादर केले असता त्यांनी त्यातला हिरवा रंग स्वीकारून सर्व सहजयोग्यांची होळी साजरी केली. त्यावेळी साहेबांनी श्रीमाताजींना रंग सादर करताना आज पाकिस्तान मध्ये देखिल होळी उत्सव होत असल्याचे सांगितले.श्री माताजी अत्यंत आनंदी होत्या.

त्यानंतर श्रीमाताजींना अनेक प्रकारचे प्रसाद सादर केले. त्यावेळी श्रीमाताजींनी जगातील सर्व सहजयोग्यांना आशीर्वाद दिले. प्रतिष्ठान मधिल बाहेरच्या मोकळ्या जागेत सजविलेली होळी विधीपूर्वक अग्नी देऊन प्रज्वलीत केली. त्यावेळी श्रीबागडदे आणि सहकारी यांनी अनेक भजने सादर केली.

●●●



प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचेप्रवचन

(संक्षिप्त)

इंग्लंड : १ जुलै १९८२

इतरांची कुण्डलिनी जागृत करण्याची शक्ति तुम्हाला मिळाली ही एक अलौकिक घटना आहेहेसमजून घ्या.

आजकालचे आधुनिक युगांतील दिवस मानवाला भ्रांन्तिमधें टाकणारे आहेत; आपल्याला काय हवं आहे, काय मागायचे आहे, आपण जे कांहीं करत आहोत ते योग्य कीं अयोग्य इ. अनेक प्रकारचे भ्रम त्याच्या डोक्यांत गोंधळ माजवतात. अर्थात हेहि खरेंच की अशा भ्रान्तिमधें घुसमटल्याशिवाय माणूस अध्यात्माकडे वळणारा साधक बनणार नाहीं; शिवाय जाणीवेच्या एका विशिष्ट पायरीवर आल्याशिवाय हा भ्रम माणसाच्या लक्षांत येत नसतो.

मोझेस (Moses)च्या काळीं त्यावेळचे ज्यू लोक गुलामगिरीच्या जीवनाला पराकोटीचे वैतागून गेले होते; त्यापूर्वी लोकांनी गुलामगिरीच्या हालअपेष्टांचा निराशेपोटी स्वीकार केला होता. पण मोझेसच्या काळीं लोकांना या अवस्थेतून सुटण्याची जाणीव होऊं लागली होती व आपल्या सर्व बांधवांना प्रतिष्ठित जीवन जगण्यासाठीं काहीतरी मार्ग काढला पाहिजे हे विचार त्यांच्या डोक्यांत डोकावत होते. याच वेळीं मोझेसचे अवतरण झाले आणि त्याने हे कार्य पार पाडले. टोकाच्या परिस्थितीमधेंच अशा घटना घडून येत असतात.

आजकालच्या आधुनिक म्हटल्या जाणाऱ्या काळामधें लोक एका वेगळ्या पण सूक्ष्म भ्रमामधे एवढे अडकले आहेत की त्या भ्रान्तीचेच ते गुलाम बनले आहेत. इतके ते त्याच्या आहारी गेले आहेत की हे सर्व आपलाच विनाश घडवून आणणार आहेत ही पुसटशी शंकाही त्यांच्या मनांत येत नाहीं. परिस्थिति इतक्या थराला गेली आहे की एवढें होऊनही मानव जागृत होऊन सत्य समजूं शकला नाहीं तर मानवनिर्मितीच्या सृजनकार्याच्या हेतूचा मागमूसही शिल्लक राहणार नाहीं. मी अनेक मोठमोठ्या विद्वान मंडळींबरोबर, संयुक्त राष्ट संघटनेसारख्या प्रसिध्द संस्थांच्या अधिकाऱ्यांबरोबर या बाबतीत खूप चर्चा केली आहे. पण सगळीकडे नुसत्या चर्चाच होत रहातात; सत्य समजून घेतले नाहीं तर मानवच आपल्या अंगभूत मानवतेचा सर्वनाश करणार आहे. आजपर्यंत कधींही न घडलेला हा आंतरिक विनाश मानवच करणार व त्यात स्वत:चाही सर्वनाश घडवून आणणार आहे हे सत्य त्यांच्या लक्षांत येत नाही.

मानव-उत्क्रान्तीच्या प्रवासातील ही गंभीर स्थिति लक्षांत घ्यायला हवी. आता मानवजात उत्क्रान्तीच्या अखेरच्या टप्प्यावर आलेली आहे. सृष्टीच्या या लीलेमधें मानव नाटकातल्या कलाकारासारखा आहे. निसर्गातील सर्व प्रक्रिया या उत्क्रांन्तीच्या हेतूनेच होत आल्या आहेत; आतां शेवटचा टप्पा म्हणजे मांनवाचे त्या परमात्म्याबरोबर प्रत्यक्ष संधान जोडले जाणें. हे झाले तरच माणसाला मानवजन्माचा हेतू समजेल व त्याची सार्थकता कशांत आहे हे लक्षांत येईल. पशूयोनीतून उन्नत होऊन मानव स्थितीला येण्याच्या

प्रक्रियेच्या मागील हेतू शास्त्रज्ञ-मंडळींनीही जाणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. साधक-प्रवृत्तीच्या अनेक लोकांच्या सुप्त चेतनेमधेंही हा विचार जोम धरत आहे. म्हणूनच आजकाल खूप साधक होऊ लागले आहेत. पण अनेकांचा प्रयत्न मानवाच्या बाह्य जीवनाशी जोडला गेला आहे; त्यामुळेच संप,वेतनवाढ, असे मागणी-आंदोलनाचे प्रकार चालवले जातात, कम्युनिझम, लोकशाही असे वाद चालतात; मला तर हे दोन्ही प्रकार हास्यास्पद वाटतात. ज्याला आपण मत देणार त्याची खरी ओळख नसेल तर मताला काय अर्थ? उलट ज्याला मत दिले तोच उद्यां भलते-सलते काम स्वार्थापोटी करुं लागला तर काय म्हणणार ? म्हणून आधी प्रत्येकानें स्वत:ला ओळखले पाहिजे व त्यासाठीं आंतल्या प्रकाशांत राहिले पाहिजे. हे होत नाहीं तोपर्यंत आपल्या सर्व विचारसरणी उथळ असतात व चुकांमधून दुष्परिणाम कळल्यावरच आपल्या ते लक्षांत येते. प्रामाणिकपणा, आर्थिक गरजा, पगार इ. बद्दल आपल्या विचारांत व आचारांत वरवरपणा असतो. तात्पुरत्या लाभांकडेच आपण पहातो. म्हणूनच असमाधान संपत नाहीं.

भौतिक सुख-साधनांकडे पाठ केली पाहिजे असा माझ्या म्हणण्याचा उद्देश नाहीं. आपल्या भौतिक गरजा, पुरवल्याच पाहिजेत; त्याच्यासाठीं प्रयत्न केलेच पाहिजेत. पण समाधान मिळेल म्हणून त्याच्याच मागें धावणे बरोबर नाही. तहान लागलेल्या माणसाच्या हातांत अगदी सोन्याचा पण रिकामा पेला दिला तरी त्यांची तहान शमणार आहे का? म्हणून वर सांगितल्याप्रमाणें अनेक साधक निर्माण होत असले तरी काय मिळवायचे हे त्यांना अजून कळलेले नाहीं. आपण कोण आहोत, आपले स्व-रुप काय आहे हे जाणले पाहिजे, त्याशिवाय आपण असमाधानी का असतो हे लक्षांत येणार नाहीं. सुप्त चेतनमधूनच ही तहान अनेकांना जाणवूं लागली आहे आणि त्याच्या मुळाशीं आपल्याला काय हवं आहे, आपण समाधानी कां नाहीं आपण काय मिळवले पाहिजे अशा धारणेमधून अधिकाधिक साधक बनूं लागले आहेत. आणि आतां ही वेळ आली आहे की प्रत्येकाने स्वत:ला ओळखले पाहिजे. आपला आत्मसन्मान मिळवला पाहिजे, आपली शक्ति ओळखली पाहिजे आणिआपण कुठें कमी पडत आहोत हे जाणलेच पाहिजे. ही शक्ति तुमच्यामधेंच प्रस्थापित केलेली आहे व उन्नतिप्रक्रियेचाच तो अंश आहे. मी फक्त ती तुमच्यासाठीं जागृत करत आहे, एका पेटलेल्या मेणबत्तीने दुसऱ्या अनेक मेणबत्त्या प्रज्वलित कराव्या तसेच हे घटित होत आहे. त्याला शास्त्रीय भाषेत कांहींही संज्ञा द्या पण माझ्या दृष्टीने हे अगदीं सरळ व सहज आहे; तुम्ही तयारच होता फक्त मी फुंकर घातली समजा. लोक मला म्हणातात, '' तुम्ही काय चमत्कार केला?'' पण जे जिवंत आहे ते सहजच घडत असते. फूल पहा, ते किती सहजपणें फुलते? आपण कधीं त्याचा विचार किंवा स्पष्टीकरण देतो का? तसेच हे अगदीं सोपे-सरळ आहे आणि म्हणूनच मी याला सहजयोग म्हणते. ते सहज होते हा एक सरळ अर्थ, तसेच ती यंत्रणा जन्मजात तुमच्याजवळच आहे म्हणूनही सहज आहे. जसे श्वास किंवा वास घेणारे नाक तुमच्याजवळ आहे, ते करण्यासाठी तुम्ही काही खास क्रिया करता का? तितकेच हे सहज आहे. ही त्या सर्वव्यापी परमात्म्याचीच किमया आहे. त्यालाच होली घोस्ट (Holi Ghost) असेही म्हणातात. हीच सर्वव्यापी परमशक्ति. फुलांचे फळ बनते, अनंत फुलांची अनंत फळे बनतात; हे कार्य कोण व कसं करते याचा आपण कधीं विचार करतो का?नाही; कारण आपण ते गृहीत धरून चालतो. माणूस जिवंत कार्य कधीच करत नाहीं, त्याचे सर्व काम निर्जीव असते, झाडाचे लाकूड वापरून फर्निचर बनवण्यासारखे . माणूस अशा निर्जीव क्रियांच्या मागे लागतो, त्याचीच त्याला संवय लागते आणि त्याचेच तो गुलाम बनतो. त्यामुळें मुळात चैतन्यमय असलेला अत्मा निद्रिस्त होतो; सर्व कार्य करणारा असूनही आपण त्याला ओळखेनासे होतो.तो जागृत झाल्यावर त्याचा प्रकाश आपल्या चित्तामधें पसरतो आणि आपण एक वेगळेच व्यक्तिमत्व बनतो, योगी बनतो. असा योगी सामान्य माणसासारखाच दिसतो व राहतो, कसला वेगळा पेहराव करत नाहीं; आंतूनच तो इतका वेगळा बनतो की या बाह्य गोष्टींचे त्याला महत्व वाटत नाही. तसेच दया दाखवणें, दान करणे असल्या वरवरच्या कार्यामधें तो स्वत:ला गुंतवून

घेत नाहीं. तो आंतूनच मूर्तिमंत प्रेम व करुणेचे रूप होतो व त्याच्या सर्व क्रियांमधून तिचा आविष्कार घडत राहतो.

मी इटलीला गेले होते त्यावेळीं तीन-चार लोक सहजयोगाबद्दल उत्सुक वाटले. पण सहजयोगांत यायला तयार नव्हते; कारण विचारल्यावर म्हणाले की इथले सहजयोगी धूम्रपान करत नाहींत व त्यांना तसे जमणार नाहीं. खरं तर मी कुणालाही दारू पिऊ नका, सिगारेट ओढू नकाअसा उपदेश कधींच करत नाहीं. तिथल्या सहजयोग्यांनीही सांगितले की पूर्वी ते चेनस्मोकर होते, खूप दारू प्यायचे पण सहजयोग घेतल्यावर कसं कोण जाणे, त्यांच्या त्या इच्छाच एकदम खलास झाल्या. याचा अर्थच हा की एकदां प्रकाशांत आल्यावर सर्व आपोआप स्वच्छ दिसते तसे हे घटित होतो. अंधारात रज्जूवर सापाचा भास होतो व घाबरगुंडी उडते पण दिवा लावला की तो साप नसून दोरच आहे हे लक्षांत येते. तसे एकदां प्रकाशांत आलात की सर्व कल्पना, पूर्वग्रह, विचित्र समजुती गळून जातात. एवढेच नव्हे तर सर्व शारिरिक आजार-कॅन्सरसारखे दुर्धर रोगही बरे होतात. मानसिक व्याधी दूर होतात. पण हे सर्व भौतिक फायदे; सर्वात महान वरदान म्हणजे तुम्हाला शक्ति मिळते; तुम्ही इतरांना साक्षात्कार देऊं शकता, मुलेसुध्दा ते करुं शकतात. विल्यम ब्लेक या कवीने म्हटलेच आहे की "Men of God will become Prophets" त्याचीच ही प्रचीति आहे. त्या काळांत त्याची ही भविष्यवाणी कुणाला नीट समजली नाही पण आतां तुमच्यासारखे योगी पाहिल्यावर त्याची सत्यता कळते. तुम्हाला शक्ति मिळाली आहे, तुम्ही दुसऱ्यांची कुण्डलिनी-शक्ति जागृत करुं शकता, त्यांच्या चक्रांमधील अडथळे दूर करून त्यांना मदत करूं शकता, म्हणजे तुम्हीही Prophet बनता; आणि विशेष म्हणजे Prophet भविष्यकाळ दाखव. पण तुम्ही वर्तमानांत राहून परमेश्वरी कार्य करता हे जास्त महत्वाचे. वाद-विवाद करून कुणालाही एरवी कांहींच यश मिळणार नाहीं, शंकराचार्यांनीही मोठमोठे ग्रंथ लिहिल्यावर शेवटी फक्त आदिशक्तीचे स्तोत्र लिहिले. इस्लाम, ज्यू, ख्रिश्चन, हिंदू सर्व धर्मांत एकांगीपणा असल्यामुळें वाद, भांडणे, युध्दच होत राहिली किंवा निरीश्वरवादी पंथ उदयाला आले. म्हणून आतां परमात्म्याची शक्ती जाणवून द्यायचा, तिच्या अस्तित्वाची प्रत्येक मानवाला-फक्त तो मानव आहे याच आधारावर-प्रत्यक्ष अनुभूति देण्याचा समय आला आहे व तेच तुमचे कार्य आहे आणि त्यासाठींच तुमच्यातील शक्ति जागृत झाली आहे. जागृतीची अनुभूती दिल्यावर कुणाला आणखी पटवण्याची जरूरी नाहीं. कारण प्रत्येक मानव स्वतंत्र आहे व त्या स्वतंत्रतेमधूनच तो स्वीकार वा अस्वीकार करण्याचा त्याला अधिकार आहे; परमचैतन्याला त्यानें कांहीं फरक पडणार नाहीं.

आजकालच्या कठीण परिस्थितीमधें परमेश्वरी शक्तीशी प्रत्यक्ष योग घटित होणें शक्य झाले आहे. यांतच या काळाचा महिमा आहे. म्हणूनच तुम्हाला सहजयोग मिळाला आहे. मानव-निर्मितीच्या उत्क्रांन्त प्रक्रियेचा हा शेवटचा टप्पा आहे. म्हणूनच त्या निराकार शक्तीचे आतां प्रगटीकरण होत आहे. ख्रिस्त, कृष्ण, मोहम्मद हे सर्व एकच आहेत व त्या सर्वांनी एकच सत्य सांगितले आहे हे तुमच्यासारखे सहजयोगीच जाणू शकतात. सहजयोगी विश्वात्मक असतो. धर्म-धर्मातील भांडणे खूप झाली, पण वेगवेगळ्या समजुतींना, सिध्दांतांना, श्रध्दांना एकाच सूत्रामधें गोवलेले एकमेव सत्य म्हणजे अनुभूति. या वरकरणी विविधतेतही एक अंतर्गत सुसूत्रता हीच आहे. जसजसी कुण्डलिनीशक्ती अधिकाधिक जागृत होईल तसतसे तिचे तेज तुमच्या समग्र बुध्दीमधें व व्यक्तिमत्त्वामधें पसरेल. चंद्र आणि त्याचा शीतल प्रकाश किंवा सूर्य आणि त्याचे तेज वेगळेपणाने नसतात. सुरुवातीला तुम्हाला आजारपण, व्यवसायातील अडचणी, आर्थिक अडचणी इ. भौतिक प्रश्न दूर व्हावेत असे वाटेल, पण ते सर्व होणार आहे. कारण माझ्याजवळच्या बैकेत तुमच्या पुण्याईचा मोठा साठा -बॅलेंस- आहे. म्हणून ती काळजी करू नका व सहजयोगांत नीट स्थिर व्हा. पूर्वीच्या चुका, सवयी मनांत न आणता सहजयोगांत प्रगल्भ होण्याचा ध्यास घ्या. परमेश्वरी शक्तीशी तुमचा योग झाला आहे व त्या शक्तीचे प्रगटीकरण तुमच्यामधून होत राहणार ही अलौकिक घटना आहे हे लक्षांत घ्या.

सर्वांना अनंत आशीर्वाद

## कव्वाली कार्यक्रम प्रतिष्ठान, पुणे
### २०, एप्रिल २००४



कार्यक्रम प्रतिष्ठान मधील हॉलमध्ये आयोजित केला होता. हॉलमधील स्टेज आकर्षक मंडप घालून सजविले होते. कार्यक्रमाची वेळ संध्याकाळी सात होती. निमंत्रित सहजयोगी उपस्थित होते. त्यामध्ये सर्व भारतातून निवडक लिडर्स उपस्थित राहिले होते. सर्वजण श्रीमाताजींच्या दर्शनासाठी आतूर झाले होते. साधारण ७.०० वा स्टेजसमोर टी.व्ही.वर पूर्वी प्रतिष्ठानमध्ये झालेल्या अनुपमादीदीच्या वाढदिवसाची कॅसेट लावली होती.

साधारण ८.३० च्या सुमारास प.पू.श्रीमाताजी, पापाजी व साधनादीदी याचे स्टेजवर आगमन झाले. त्यांच्या सोबत श्री राजेंद्र पुगालिया, श्री नलगिरकर, श्री जलानसाहेब होते . श्रीमाताजीं आसनावर विराजमान झाल्या. त्यांच्या शेजारी पापाजी व साधनादीदी बसल्या होत्या. श्रीमाताजींच्या चरणावर श्रीनलगिरकर व श्री जलान यांनी हार आर्पण केला. श्रीपापाजींचे श्री राजेंद्र पुगालिया यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

या नंतर हैद्राबादचे प्रसिध्द सुफी कव्वाल यांनी श्रीमाताजींच्या चरणांचे दर्शन घेऊन कव्वाली सुरु करण्याची परवानगी घेतली. ''हर मेहर को देखा देखा'' ही कव्वाली गायला सुरवात केली साधारण ९.०० च्या सुमारास ''बोल रहा है तन मन सारा माताजी सहजयोगीका हर दम नारा माताजी'' ही कव्वाली गायला घेतली आणि सर्वजण उठून नाचू लागले. कव्वाली गाता गाता मध्ये शेर सादर करीत त्यांनी कव्वाली बरीच खुलवली. त्यानंतर ''मोरे पिया घर आया'' हे एक सुंदर शास्त्रीय गाणे सादर केले. शेवटी १०.०० च्या सुमारास ''माता की नजर का हर सदका नरजोंसे गुजारा करते है'' ही कव्वाली म्हणताना परत एकदा सर्वजण नाचू लागले. रात्री १०.३० च्या सुमारास कव्वालीचा कार्यक्रम संपला.त्यानंतर श्रीमाताजी आरामकक्षात गेल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री प्रशांत दिवेकर यांनी केले.प्रतिष्ठानच्या मागच्या लॉनवर सर्व सहजयोग्यांसाठी जेवणाची व्यवस्था केली होती. सर्वजण अत्यंत आनंदात प्रसाद घेऊन आदिशक्तीचे मिळालेले दर्शन नजरेत साठवून ११.३० च्या सुमारास घराकडे निघाले.



# ।। श्री गणपत्यथर्वशीर्ष ।।

(अंक क्रमांक १-२ ,२००४पासून पुढे)

गणेशविद्या सविस्तर सांगून झाल्यावर अथर्वणऋषी आतां गणपतीचा गायत्री - मंत्र सांगत आहेत. सात छंदात गोविलेल्या वैदिक मंत्रात गायत्री-छंद हा प्रधान छंद आहे. गायत्री-छंदात गुंफलेल्या मंत्राला गायत्री मंत्र म्हणतात. त्यांत सूर्योपासना असते असे नाहीं. गणेशभक्त गायत्री मंत्राने आपल्या उपास्य दैवताची आराधना करतांना हा मंत्र म्हणतात.'

मंत्र : एकदंताय विद्महे वक्रतुंडाय धीमहि ।
तन्नो दन्ती प्रचोदयात् ।।

अर्थ : आम्ही एकदंतास जाणतो व वक्रतुंडाचे ध्यान करतो. तरी दन्ती (ध्यानास )प्रेरक होवो.

भावार्थ : 'एकदंत' हे गणपतीच्या अनेक नावांपैकी एक नाव आहे हे सर्वजण जाणतातच. कांहीं पुराणांत 'एक' म्हणजे 'माया' व 'दंत' म्हणजे 'सत्ता' अर्थात 'मायेचा अधिपति' असाही अर्थ कुणी करतात.असो.

'विद्' म्हणजे जाणणें. गणपतीचे परब्रह्मस्वरूप जाणून त्याचे ध्यान करतो असा अर्थ इथे अभिप्रेत आहे.

'वक्रतुंड' हे नांव सर्वांच्या परिचयाचे आहे. आणखी एक अर्थ असा घेतला जातो- 'वक्र' म्हणजे 'वाईट, अवैध्य' आणि 'तुंड' या धातूचा अर्थ 'नाश करणें ' ; अर्थात दुष्कृतांचा नाश करणारा असाही एक अर्थ .सांगितला जातो.

'दंन्ती' हेहि गणपतीचे एक नांव.सर्व देऊन टाकणारा म्हणजे उदार (सर्वार्थदाता) असाही अर्थ केला जातो.

'प्रचोदयात् ' म्हणजे (आपल्या भक्तीची) प्रेरणा देवो.

या पुढील मंत्रांत ऋषी भक्तिउपासनेचा गौरव म्हणून श्रीगणेश रुपाचे वर्णन करत आहेत.

मंत्र : एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम् ।
रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं मूषकध्वजम् ।
रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम् ।
रक्त गंधानुलिप्तांगं रक्तपुष्पै:सुपूजितम् ।
भक्तानुकंपिनं देवं जगत्कारणमच्युतम् ।
आविर्भूतं च सृष्टयादौ प्रकृते : पुरुषात्परम् ।
एवं ध्यायति यो नित्यं स योगी योगिनां वर: ॥

भावार्थ : श्रीगणेशांच्या आराधना-स्वरूपाचे वर्णन सर्वांना परिचित आहेच. या परिचित रुपाचेच हे वर्णन असल्यामुळें त्याचा सविस्तर अर्थ विवरण करून सांगितला नाही तरी चालण्यासारखे आहे. सर्वांना प्राणप्रिय अशा गणपति-रूपाचे हे स्तवन आहे.

''भक्तानुकंपिनं देवं जगत्कारणमचुतम् .....पुरूषात्परम्'' . एवढा उपमंत्र सारांशरुपानें महत्त्वाचा आहे; भक्तांवर निरंतर कृपादृष्टि असणारा देव, जो सृष्टिनिर्मितीपूर्वीही होता व जो 'प्रकृति' आणि 'पुरुष' यांच्याहून थोर असा 'पुरुषोत्तम' आहे; म्हणूनच अशा पुरुषोत्तम स्वरूपाचे नित्य-निरंतर ध्यान करणारा सर्व योग्यांमधे श्रेष्ठ ('योगिनां वर:') आहे हे स्तवन अति-सुंदर आहे.

परब्रह्मस्वरूप श्रीगणपतीचे स्तोत्ररूप स्तवन व ध्यान महात्म्य सांगून झाल्यावर अथर्वणऋषी नमनाचा मंत्र सांगून व शरणागत होऊन ग्रंथसमाप्ति करतात.

मंत्र : नमो व्रातपतये नमो गणपतये नम: प्रमथपतये नमस्ते अस्तु लंबोदरायैकदन्ताय विघ्ननाशने शिवसुताय श्रीवरदामूर्तये नमो नम: ॥

अर्थ : व्रातपतीला, गणपतीला, प्रमथपतीला, लंबोदराला, एकदंताला, विघ्नहर्त्याला, शिवसुताला व मुक्त हस्तानें वर देणाऱ्याला पुन:पुन: नमस्कार असो.

भावार्थ: मंत्राचा अर्थ बराचसा सोपा व लक्षांत येण्यासारखा आहे; कांही निवडक शब्दांचा भावार्थ पुरेसा होईल. '' व्रातपती '' या शब्दाचा 'देवांचा समुदाय' असा अर्थ करतात. 'व्रात' म्हणजे 'समुच्चय'; या शब्दांतही 'सर्व इदं' अर्थात चराचर व समस्त देवदेवता हा भावार्थ अध्याहृत आहे; या सर्वांचा स्वामी म्हणजेच गणपति.

'प्रमथपती' या शब्दाचा रूढ अर्थ 'शंकराचे सेवक-(गण)' यांचा स्वामी. कांही व्युत्पत्ति-ज्ञानी त्याचा अर्थ 'पीडेवर मात करणारा' (मथ् म्हणजे पीडा) असाही करतात. गणपति ओंकारस्वरुपात सृष्टीकर्ता असल्यामुळें 'प्रथमपतये' असाही शब्द कांहीं पाठांत आहे.

इथें अर्थर्वशीर्षातील मंत्र -स्तोत्रांचे विवेचन संपले.

---

टीप :-प.पू.श्रीमाताजींच्या कृपेने अंक क्र. ५,६ मे-जून २००३ पासून सुरु केलेली अथर्वशीर्ष , विवरण मालिका आता समाप्त करीत आहोत. अथर्वशीर्षाचे पठण करताना त्याचा गर्भितार्थ लक्षात येऊन चिंतनास प्रेरणा मिळावी व ध्यानांत मदत व्हावी हा या मालिकेचा उद्देश होता. त्यांत कांही कमी-जास्त झाले असल्यास जरुर आमच्या निदर्शनास आणावे.

जय श्रीमाताजी.

## श्रीशिवपूजा, पुणे
## फेब्रवारी २००४ वृतांत









परम पुज्य श्रीमाताजी निर्मला देवींच्या आशीर्वादात शिवपूजा पुण्यातील निसर्गरम्य बालेवाडी परिसरात दिनांक १३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत संपन्न झाली. कार्यकर्ते जानेवारी पासूनच पूजेच्या तयारीला लागले होते. स्टेडियम साधारण एक आठवडा आगोदरच ताब्यात घेतले होते. साधारण आदल्या दिवशी सकाळ पासूनच सहजयोगी स्टेडियममध्ये येऊ लागले. त्यांचे स्वागत करुन त्यांना त्यांच्या रहाण्याच्या ठिकाणाची जागा कार्यकर्ते जातीने देत होते.

<u>१३ फेब्रुवारी २००४</u> :-

आजच्या कार्यक्रमाची सुरवात सकाळच्या ६.३० वा च्या सामूहिक ध्यानाने झाली. स्टेडियमधील सेमिनार हॉलमध्ये स्टेज घालून ध्यानासाठी व दिवसाच्या कार्यक्रमासाठीची व्यवस्था केली होती. ध्यानामध्ये प्रामुख्याने शास्त्रीय संगीताचा वापर करीत असल्याने ध्यान चांगले होत होते. ध्याना नंतर श्रीमाताजींच्या अमृतवाणीची ऑडिओ कॅसेट लावली होती.

सकाळी ११.३० च्या सुमारास भजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यामध्ये श्री बागडदे आणि सहकारी यांची भजने झाली. त्यांनी, ' जय गणपती वंदन गणपती, नानक महोम्मत, जय दुर्गे दुर्गत परिहारिणी, उठ भवानी, कुण्डलिनी चढी बढी जाय' ही बहारदार भजने गाऊन सर्वांचा प्रवासाचा थकवा काढून टाकला.

संध्याकाळी ७.३० च्या सुमारास स्टेडियममध्ये कार्यक्रमाची सुरवात तीन महामंत्रांनी झाली.प्रथम श्री बागडदे आणि सहकारी यांनी,' दुर्गटी हारिणी दुर्गा अंबे तेरी जय जय कार हो' हे भजन सादर केले. त्यानंतर ७.४५ च्या सुमारास श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन झाले. त्यांच्या गाडीपुढे व मागे पुणे युवाशक्तीची मुले मोटारसायकलवर आकर्षक पेहरावात होते.

"आदिशक्तीसमोर निर्मल- संगीत- सरिताचे सितारवादक श्री शवलीकर यांनी सतार वादन केले. त्यांना तबल्याला साथ श्री पापटकर यांनी दिली. त्यांनी राग 'जयजयवंती' वाजवून सर्वांची वाहवा मिळवीली. त्यानंतर विश्व निर्मला विद्यालय पुणे च्या बालसहजयोगी मुलांनी ''भारत हमको जानसे प्यारा है '' या देशभक्ती गीतावर स्टेजवर आकर्षक नृत्य सादर केले.

साधारण ८ च्या सुमारास प्रसिध्द शास्त्रीय गायीका श्रीमती रेवा नातू स्टेजवर गायला बसल्या. त्यांना तबल्याला विनय पाठक व हार्मोनियम प्रणव यांनी साथ दिली. त्यांनी सुरवातीला 'सुखदाता सबके शंकर, त्यानंतर 'हे शिव शंभू त्रिपुहारी'ही दोन शास्त्रीय भजने गायली व सर्वांना चकित केले.शेवटी त्यांनी 'सिध्द भजो ओंकार भजो' हे भजन सादर करुन त्यांचा कार्यक्रम संपवला.

त्यानंतर पुण्याचे श्री बागडदे आणि सहकारी यांचे स्टेजवर आगमन झाले.त्यांनी 'शिव बंब भोले निगाहे करम ' ही नवीन शिवावरची कव्वाली पहिल्यांदाच सहजयोगात सादर केली. श्रीमाताजी पेंडॉल मधून गेल्यानंतर वैतरणा ॲकडमिच्या नवीन सहजयोगी विद्यार्थ्यांचे स्टेजवर आगमन झाले.त्यांच्या सोबत डॉ राजेश व जलान साहेब होते. त्यांनी सुरवातीला 'मेरी











मॉ पुनम का चांद, सहजी झुम झुम के गाये, झुक झुक झुक रेल चली है जीवनकी, दमा दम मस्त कलंदर ही ठेक्यातील भजने सादर करीत सर्वांना नाचवले. त्यानंतर सुब्रमण्यम यांच्या मार्गदर्शनाखाली, 'देवा वेवा महादेवा, मॉ निर्मल मॉं जय जय निर्मल मॉ, माऊलीने ठोठावले दार, शिवो हं शिवो हं,' ही भजने सादर केली. कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे ११.०० वाजून गेले होते.

<u>१४ फेब्रुवारी २००४</u>

आजच्या कार्यक्रमाची सुरवात सकाळी ६.३० च्या सामुहिक ध्यानाने झाली. ध्यानामध्ये शास्त्रीय संगीत लावले होते. ध्यानानंतर श्रीमाताजींची अमृतवाणीची कॅसेट लावली होती.

सकाळी ११.३० च्या सुमारास कार्यक्रमासाठी परत सर्वजण एकत्र जमले. त्यामध्ये लहान मुले व नवीन कलाकारांनी त्याची भजने व कार्यक्रम सादर केले. त्यात सुरवातीला कलकत्ता युवाशक्तीने भजन गायले.त्यानंतर एका लहान मुलाने स्वातंत्र्य विर सावरकरांचा पेहराव डोक्यावर काळी टोपी,धोतर, सदरा, चश्मा व हातात छत्री घेऊन स्टेजवर आगमन झाले त्याने सावरकरांचे भाषण मराठी,इंग्रजी व हिंदी भाषेत अत्यंत आवेशपुर्ण करुन सर्वांची वाहवा मिळवीली.

त्यानंतर जेजुरी शाळेचे विद्यार्थ्यांचे स्टेजवर आगमन झाले. नवीन कलाकार महिलेले जागो कुण्डलिनी मॉ, तामिळ चन्नमा तेलंगर यांनी तामिळ भजन 'मॉ निर्मल मॉ आदिशक्ती निर्मल मॉ ' हे भजन म्हणून उपस्थितांना चकित केले.शिला दिक्षित व सोनाली बिलासपूर यांनी श्रीजगदंबे आई रे मेरी निर्मल मॉ', हरी सिंग सहदी यांनी कविता ,' गणपतीपूळे मे है मेरी मैया की निर्मल नगरी'वाचन करताना सर्वांची वाहवा मिळविली.

यानंतर जेजूरी शाळेच्या विद्यार्थ्यांचे आकर्षक वेशभूषेत स्टेजवर आगमन झाले. त्यांनी कॅसेटवर मुरळी डान्स, येळकोट येळकोत जय मल्हार सादर केले. त्यांच्या विद्यालयाच्या मुलांनी महाराष्ट्राची लोकधारा सादर करताना, वाघ्या मुरळी डान्स, सहजाची दिंडी, धनगर डान्स, जोगवा, लावणी व शेवटी कोळी डान्स सादर करुन प्रचंड टाळ्यांच्या आवाजात सर्वांची पसंती मिळवीली. त्यानंतर डॉ दिपक वर्मा स्टेजवर आले. त्यांनी मेरी मॉ पुनम का चांद व गझल, ' मॉ मै तेरे दर पे है क्या क्या गुजरी दिलपे सुनाने आये है मॉ तुम्हे पाने आये है' म्हणून सकाळचा कर्यक्रम संपला.

संध्याकाळच्या कार्यक्रमाची सुरवात साधारण ७.०० च्या सुमारास झाली. त्यामध्ये सुरवातीला डॉ राजेश यांनी, 'जय गणेश देवा, शिव भोला भंडारी, ही भजने गायली.दिपक वर्मा यांनी,'शिव शंकर रखवाला मेरे शंभू भोला भाला मेरा, डम डम डमरु बजाये' ही भजने गायली. डॉ सुब्रमण्यम यांनी,'पवन झकोरा लायेरे संदेशा श्रीमाताजींकि आनेका, वंदन करुया श्रीमाताजींना' ही भजने सादर केली.

त्यानंतर प्रसिध्द गायक श्री शामुक अभिजीत आणि सहकारी यांनी भजने सादर केली त्यामधे , महादेव महादेव, एक सुर चंग चंग छायो, मेरा तेरा







मनवा अत्यंत चांगल्या प्रकारे सादर केली. त्यानंतर पुण्याच्या युवाशक्तीने स्टेज समोर छोट्याशा मिरवणूकीत लेझिम सादर केली.त्यावेळी वेगवेगळे पेहरावात मुले सामिल झाले होते.त्यात झाशीची राणी, राजा शिवाजी दाखविण्यात आले. त्यावेळी आकाशांत फटाक्यांची आताशबाजी करण्यात आली. त्यामुळे जरी आज श्रीमाताजी सगुण रुपात कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित नसल्य तरी त्यांची निर्गुणरुपतील उपस्थितीची सर्वांना जाणिव होत होती.

प्रो. अरुण चंदिवले आणि गृपचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरवातीला शिव स्तुती सादर केली.त्यावेळी स्टेजवर शिव-पार्वती दाखविले होते. त्यानंतर श्री गणेश वंदना सादर करताना शंकर -पार्वतीसमोर श्रीगणेश नृत्य करीत स्तुती करीत असल्याचे दाखविले होते. त्यानंतर साधारण १०-१५ जणांच्या गृपने अनेक नृत्याचे प्रकार दाखविले. त्यात करटाकी डान्स, सरस्वती वंदना तसेच काश्मिरी बुमरो नृत्य सादर करतान सर्वांना चकित केले.

राजस्थानी भवाई नृत्य सादर करताना एकाने डोक्यावर पाच हंड्यांची रास घेऊन अनेक नृत्याचे प्रकार सादर केले. त्यावेळी पायाखाली परात, खिळ्यांची तबकडीवर उभे राहून सर्वांना चकित केले.

लावणी प्रकार सादर करताना ,'रेशमाच्या रेशांनी लाल काळ्या धाग्याने' या प्रसिध्द लावणीवर ३ जणींनी नृत्य करीत सर्वांना चकित केले.पंजाबी भांगडा प्रकार साधारण १०-१२ जणांनी सादर करताना स्टेजवर अनेक वेगवेगळे प्रकार व मनोरे सादर करीत वातावरण बद्लून टाकले होते.

श्री रोमेल वर्मा (श्रीमाताजींचे जावई) यांनी शिवांबद्दल माहिती देताना सांगितले,

" मी सारे हिमालयात भ्रमण केले आहे. शिवांची शक्ती - उर्जा प्रचंड मोठी आहे. आपल्या सर्वांना प.पू.श्रीमाताजींच्या कृपेत उद्याच्या पुजेत ही शक्ती प्राप्त होणार आहे . आपण सर्वजण खरोखर भाग्यवान आहोत.

पूर्वी आर्य जेव्हा या हिमालया जवळ आले तेव्हा त्यांना या शक्तीची - उर्जेची जाणिव झाली. त्यांनी या शक्तीला सुरवातीला शिश्न देव असे म्हटले आहे. नंतर या शक्तीला 'शिवजी' म्हटले गेले. अर्जुनाला उत्तरेत फिरताना शिवांनी अनेक शक्त्या प्रदान केल्या होत्या.त्यामुळेच त्याने कौरवांचा संहार केला. तसेच मेवाडच्या चितोड राजाला १४०० वर्षापूर्वी श्री शिवजी स्वप्नात येऊन दर्शन दिले होते. त्यामुळेच तिकडे महाराणा सारखे अनेक योध्दे निर्माण झाले

तसेच स्वामी विवेकानंद यांची आई मुलगा होण्यासाठी रोज शिवजींना प्रार्थना करीत असत. त्या शिवजीच्या प्रसादाने त्यांना स्वामी विवेकानंद सारखा मुलगा प्राप्त झाला.

त्यांनी स्वत:च्या जन्माबद्दल सांगितले की, ते आईच्या पोटात गर्भवस्थेत साडे दहा महिने होते. त्यावेळी आईची सुटका होण्यासाठी आईने शिवजींना प्रार्थना केली असता शिवजींनी स्वप्नात येऊन सर्व व्यवस्थित होईल असे सांगितले आणि माझा जन्म झाला.

मी प.पू.श्रीमाताजीच्या परिवारात असल्यामुळे मी स्वत: फार भाग्यवान











आहे. मला श्रीमाताजींचा त्यामुळे अनेक वेळा सहवास लाभतो. तरी देखील मला प्रत्येक वेळी मिळालेला सहवास कमी वाटतो. त्यांच्या दर्शनासाठी आपल्यासारखा मी देखील सतत उत्सुक असतो. उद्या आपल्या सर्वांना आदिशक्तीचे शिव रुपात दर्शन मिळणार आहे या क्षणाची मी आपल्याप्रमाणेच आतुरतेने वाट पहात आहे.''

यानंतर वैतरणा ॲकडमिच्या मुलींनी क्लासिकल नृत्य सादर केले. रात्री १०.३० च्या सुमारास हैद्राबादचे प्रसिध्द कव्वाल यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यानी सुरवातीला,'छोड रहा है तन मन सारा श्रीमाताजी सहजयोगका हर दम नारा श्रीमाताजी' तसेच अल्ला हू अल्ला हू ये जमी ना थी आसमा ना था' या कव्वाल्या सादर करताना मध्ये अनेक शेर टाकत सर्वांना तासभर नाचवले.

<u>दिनांक १५ फेब्रुवारी २००४</u>

आजच्या पुजेच्या दिवशी सकाळचे ध्यान ६.३० वाजता घेतले. आज ध्यानासाठी उपस्थिती रोजच्या पेक्षा जास्त होती.ध्यानामधे क्लासिकल संगित लावले होते. त्यानंतर श्रीमाताजींची अमृतवाणीची कॅसेट लावली होती.

दुपारी ११.३० च्या सुमारास दुपारच्या सत्रातील कार्यक्रमाची सुरवात राजस्थान गृपच्या भजन 'रंगदे मोरी माता, मैया तोरे चंदा जैसा रुप सलोना' ही दोन भजने म्हटली. त्यानंतर पुणे युवा शक्ती व वाराणसी युवाशक्तीने मिळून ' ध्यान जो लगाओ' हे भजन म्हटले.

त्यानंतर डॉ राजेश गायला बसले.त्यांनी एक नविन भजन ' भाग्य लक्ष्मी' सादर केले.तसेच इतर भजने गायली. या तीन दिवसांच्या दुपारच्या सत्राचे सुत्रसंचलन श्रीबागडदे यांनी केले होते. त्यांना पेटीला साथ प्राजक्ताने तसेच तबल्याला साथ मिलींद दाभाडे तसेच ढोलकीला साथ कुमार ऋशिकेश तिखे याने दिली.


शेवटी श्री अरुण आपटे यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सर्वांकडून शिव-पार्वतीचा मंत्र म्हणवून घेत सर्वांकडून साधारण अर्धा तास ध्यान करून घेतले . कार्यक्रम संपला तेव्हा दुपारचे १.०० वाजले होते.

संध्याकाळी स्टेडियम मध्ये पुजेसाठी आधीच्या दोन दिवसांपेक्षा जास्त गर्दी जमली होती.साधारण ७.०० च्या सुमारास पुजेतील भजनांची सुरवात श्री व सौ अरुण आपटे यांच्या 'उमा उमा शिव शंकर' या भजनाने झाली. सुब्रमण्यम आणि वैतरणा गृपने 'देव देव महादेव' तसेच श्री बागडदे आणि सहकारी यांनी,'शंकराच्या दर्शनाचा ध्यास जिवा लागला' दिपक वर्मा यांनी शिव शंकर रखवाला मेरा' हे भजन सादर करताना ८.३० च्या सुमारास श्रीमाताजींचे आगमन झाले. त्यावेळी त्यांचे रुप वेगळेच जाणवत होते. छोट्याशा अमृतवाणीत त्यांनी सर्वांना मार्गदर्शन केले.


त्यानंतर श्रीमाताजीची प्रथम देवी स्वरुपात पुजा करताना २१ लहान











मुलांनी श्रीमाताजींच्या चरणाची पूजा केली. त्यावेळी पुजेतील गाणी, गणेश स्तुती, तुझ्या पुजनी, दूर्गती हारिनी दूर्गा अंबे,हासत आली निर्मल आई, विश्व वंदीता' ही भजने झाली त्यानंतर देवी स्वरुपातील आदिशक्तीचे दर्शन सर्वांना झाले.

प्रत्यक्ष शिव स्वरुपातील पूजा चालू असताना , शिव शंकर चले कैलास,बोलो शिव शिव शंभो डम डम डम, शंकर भोले भाले ही भजने म्हटली. त्यानंतर सर्वांना शिवांच्या महारुपातील दर्शन झाले त्यावेळी आदिशक्तीने हातात त्रिशुळ धारण केला होता. सर्वत्र थंड थंड चैतन्य जाणवत होते. त्यावेळी स्टेजच्या समोरच्या बाजूला आकाशात बरोबर एक मोठा तारा दिसत होता. रात्रीचे १०.१५ वाजून गेले होते.

पूजेनंतर जगभरातून श्रीमाताजींसाठी आणलेल्या प्रेझेंटस् सादर करण्याचा कार्यक्रम झाला. साधारण ११.०० च्या सुमारास कार्यक्रम संपल्यानंतर श्रीमाताजी पेंडॉलमधून प्रतिष्ठानकडे निघाल्या.

शिवपूजेची तयारी जानेवारी पासून मोठ्या प्रमाणात सुरु झाली होती. अनेक वेगवेगळ्या कमिट्या स्थापन झाल्या होता. त्यामध्ये सर्व भारतातील सर्व भागातील सहजयोगी सहभागी झाले होते. स्टेडियम ५-६ दिवस अगोदरच ताब्यात घेतले होते. पुजेसाठी साधारण ११ फेब्रवारी पासून सहजयोगी यायला लागले . त्यांना राहण्याच्या व्यवस्थेची माहिती देण्यासाठी 'ॲकोमोडेशन' अनाउंसमेंट, ट्रान्सपोर्ट, मेडिकल कॅम्प या चार-पाच दिवसात २४ तास काउंटर सहजयोग्यांच्या सेवेसाठी सतत कार्यरत होते.फॅारेनर्स साठी राहण्याची वजेवणाची व्यवस्था उल्लेखनिय केली होती. तसेच इंडियन सहजयोग्यांसाठी भोजनाची व राहण्याची व्यवस्था करताना कार्यकर्ते जातीने देखरेख करीत होते. सर्वत्र पाणी व्यवस्थीत आहे का? स्वच्छता आहे का? हे पाहिले जात होते. तसेच मार्गदर्शनासाठी सर्वत्र बोर्ड लावले होते.

स्टेडियम मधील स्टेजची रचना स्टेजवर श्रीमाताजींची गाडी जाण्यासाठी सोईची होईल अशी केली होती. स्टेजच्या मागच्या बाजूला देखावा हैद्राबादचे प्रसिध्द सहजयोगी कलाकारांनी कैलास पर्वताचा देखावा सादर केला होता. त्यामध्ये लाईटचा वापर करुन आणखी आकर्षक केला होता. तसेच सर्वत्र आकर्षक फुलांचा वापर करुन स्टेजवरील सजावटीत भर टाकली होती.

पूजेनंतर महाप्रसादासाठी जवळपास २० काउंटर लावले होते. त्यामुळे सर्वांना कमी वेळात प्रसाद, छोट्याशा पाण्याच्या बाटलीसह मिळत होता. त्याचबरोबर सर्वांना व्हायब्रेटेड तीर्थ, कुंकु, गेरु व्यवस्थीत पॅक केलेल्या पॅकिटमधे देण्यात येत होते. पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था, ट्रान्सपोर्ट ची सुविधा, डॉक्टरांचा स्वतंत्र कॅम्प अशा सर्व प्रकारच्या व्यवस्था केलेल्या होत्या.



निर्मल इंन्फ्रोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि.या कंपनीकडे सीडी.,कॅसेट,पुस्तके वितरण व्यवस्था हस्तांतरित करण्याचा कार्यक्रम व वनदेवी फॅक्टरी मधील गोळ्या तयार करण्याचे व तेल शुध्द करण्याच्या मशिनचा उदघाटन समारंभ -प्रतिष्ठान, १५.एप्रिल,२००४

प्रतिष्ठान मध्ये निर्मल इंन्फ्रोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि मार्फत सहजयोगाच्या सी.डी.,कॅसेट, पुस्तके संपुर्ण भारतभर वितरण व विक्री करण्यासाठी कंपनीच्या ताब्यात देण्याचा कार्यक्रम तसेच वनदेवी फॅक्टरीसाठीची नविन घेतलेल्या मशिनरीचे उदघाटन कार्यक्रम आयोजित केलाहोता.त्यासाठी निवडक सहजयोगी उपस्थित होते. सकाळी ११.०० सुमारास श्रीमाताजींच्या रुमच्या बाहेर सितार वादन सुरु झाले आणि सर्व वातावरण प्रसन्न झाले. आंतील कक्षामधें श्रीमाताजी व पापाजी अत्यंत प्रसन्न मूडमधें त्यांच्या कोचवर बसलेले होते. बाजूला कल्पनादीदी बसलेल्या होत्या. श्रीराजेंद्र पुगालिया यांनी श्रीमाताजींच्या चरणावर गुलाबाच्या फुलांची माळ अर्पण केली.

वनदेवी फॅक्टरीचे तेल शुध्द करण्याच्या मशीनचे श्रीमाताजींनी फित कापून उदघाटन केले. त्यानंतर औषधाच्या गोळ्या तयार करण्याच्या मशिनचे श्रीमाताजींनी फित कापून उदघाटन केले.श्री राजेंद्र पुगालिया यांनी श्रीमाताजींच्या पुढे एका सजविलेल्या तबकात भारतातील सर्व कॅसेट व सी.डी. ठेवल्याचे तबक ,सहजयोगाची प्रकाशित झालेली सर्व पुस्तके चैतन्य लहरी अंक, युवाद्दष्टी अंक असलेले तबक, श्रीमाताजींचे पुजेतील फोटो असलेले तबक हातात घेऊन श्रीमाताजींना सादर केले.त्यानंतर वनदेवीचे श्री पाटील यांनी वनदेवीची औषधे असलेले तबक श्रीमाताजींना सादर केले. श्रीमाताजींना त्यावेळी अनेक गिफ्ट सादरकेली.श्रीराजेंद्र पुगालिया यांनी श्रीमाताजींना व पापाजींना महाप्रसाद अर्पण केला.

त्यानंतर श्रीमाताजी व पापाजीच्या जवळ सौ कल्पनादिदी बसल्या. त्यांच्यासमोर फुलांचे गुच्छ मांडून आरास केली होती. श्रीपापाजींनी या प्रसंगी श्रीमाताजींनी सांगितल्यानुसार छोटेसे भाषण करताना सांगितले की, ''आजचा हा निर्मल इन्फ़्रोटेक कंपनीमार्फत भारतभर सहजयोगाचे साहित्य वितरण व विक्री व्यवस्था सोपवण्याचा तसेच वनदेवीची दोन मशिनच्या उदघाटअनाचा कार्यक्रम श्रीमाताजींच्या हस्ते संपन्न झाला आहे. यापेक्षा चांगला कार्यक्रम होऊच शकत नाही.''सर्व सहजयोग्यांना मी आवर्जून सांगतो की,ज्याप्रमाणे सहजयोग प्रसार-प्रचाराचे काम तुम्ही सर्वजण करता त्याच प्रमाणे या दोन कंपन्यासाठी काम केले पाहिजे. या दोन्ही कंपन्या या समाजात आदर्श झाल्या पाहिजेत.''

पुढील काळात निर्मल इंन्फ्रोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि कंपनी मार्फतच सर्व कॅसेट, सी.डी,पुस्तके, मासिके यांचे वितरण व विक्री केली जाणार आहे. याशिवाय दुसरा कोणताही स्टॉल राहणार नाही. त्यामुळे सर्व सहजयोगाचे साहित्य एकाचवेळी सव ठिकाणी एकाच किमतीला वितरीत होणार आहे.

# प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचा ८१ वा. वाढदिवस समारंभ, निर्मल-नगरी; चावलागाव,दिल्ली, १९-२१ मार्च २००४

जगभरांतील समस्त सहजयोगी आतुरतेने वाट पहात असलेला आदिशक्तीचा ८१ वा वाढदिवस समारंभ उल्हासपूर्ण वातावरणांत साजरा झाला. मोठ्या संख्येने- सुमारे १५ ते १८ हजार सहजयोगी उपस्थित होते. दहा-बारा हजार योगी बसूं शकतील असा भव्य मंडप उभारला होता व असंख्य सुशोभित फुले , तोरणे आणि रंगीबेरंगी फुगे यांनी तो मंडप सजवला होता. स्टेज व आदिशक्तीचे सिंहासन स्वर्गात आल्यासारखे वाटावे इतक्या कलात्मक व दिव्य स्वरूपात तयार केले होते. दिल्लीमधिल व इतर कार्यकारी योग्यांनी अफाट परिश्रम घेऊन आयोजलेल्या या समारंभाबद्दल सगळीकडे त्यांची वाहवाच होत होती.

दिनांक १९.३.२००४

सकाळी ६.३० वा सामूहिक ध्यान झाले. त्यानंतर दुपारी ११.३० च्या सुमारास पेंडॉलमधे ध्यानाच्या गहनतेचा कार्यक्रम साधारण १.३० तास झाला. त्यामध्ये प्रार्थनेतून श्रीमाताजींच्या वेळोवेळच्या भाषणातील महत्वाचा अर्थाची अमृतवाणी लावून सर्वांचे ध्यान घेतले

संध्याकाळी मुख्य पेंडॉलमधे सर्वजण साधारण ६.०० च्या सुमारास येऊ लागले. पेंडॉल फुलांनी व फुग्यांनी सजविलेला होता. स्टेजवर आकर्षक डेकोरेषन केले होते. कार्यक्रमाची सुरवात ७.०० च्या सुमारास तीन महामंत्रांनी कार्यक्रमाची सुरवात झाली, सर्व पेंडॉलमधे सर्वत्र १२-१४ टेलिव्हीजन एल.सी.डी.सेट लावलेले होते. स्टेजवर दिपक वर्मा, संजय तलवार, पं. बालसुब्रमण्यम, डॉ. राजेश , श्री धुमाळ यांनी आदिशक्ती येण्याच्या आगोदर प्रसिध्द भजने सादर केली.त्यानंतर भरत नाट्य सादर केले, स्थानिक युवाशक्तीच्या मुला-मुलींनी डान्स सादर केला, धरमशाळेच्या मुलींनी कथ्थक नृत्य सादर केले.

आदिशक्तीचे साधारण ९.०० च्या सुमारास आगमन झाले. त्यावेळी गेटसमोरील बैठकीवर सनईचा मंगल धून वाजवित होते. फटाक्याच्या आतषबाजीने सर्व आकाश भरुन गेले होते. आदिशक्तीच्या पांढऱ्या शुभ्र मर्चडिस



गाडीसमोर बॅण्ड पथक तालात वाजवत होते. श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन झाले त्यानंतर एका रशियन मुलीने श्रीमाताजीच्या आशीर्वादाने ७ वर्षे रियाज करुन पहिला स्टेज शो श्रीमाताजीच्या समोर सादर केला. त्यावेळी सर्वांनी वाहवा केली. श्री धुमाळ यांनी सिंथेसायजरवर राग वाजवून सर्वांना मोहित केले. कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे जवळ पास १२.०० वाजले होते.

दिनांक २०.३.२००४

आजच्या दिवसाची सुरवात सकाळच्या ६.१५ च्या सामुहिक ध्यानाने झाली. साधारण अर्धा तास ध्यान झाले. परत दुपारी ११.३० च्या सुमारास ध्यानाच्या गहनतेचा कार्यक्रम साधारण १.०० पर्यंत चालू होता. संध्याकाळी फेलीस्टेशनचा कार्यक्रम आयोजीत केला होता. त्यामध्ये श्री नलगीरकर, श्री राजीवजी, तसेच प्रतिष्ठीत मान्यवरांनी भाषणे केली. त्यावेळी सर श्री सी.पी.श्रीवास्तव साहेबांनी, '' प.पू.श्रीमाताजींचे पुढील अनेक वर्षे आपण सर्वजण वाढदिवस साजरा करु यात.तसेच आजची समोर दिसणारी ही लहान मुले जेव्हा मोठी होतील त्यावेळी त्यांच्या हातून असाच श्रीमाताजींचा वाढदिवस व्हावा तसेच त्याचे आरोग्य चांगले राहो अशी मी सर्व जगातील सहजयोग्याबरोबर प्रार्थना करतो.

त्यानंतर जगप्रसिध्द गायक दि.बू.चौधरी यांचे

स्टेजवर आगमन झाले. त्यांनी रागदारी सादर करीत सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे १२.०० वाजून गेले होते. त्यावेळी सर्व सहजयोग्यांनी उभे राहून वाढदिवसाची प्रार्थना केली. आतल्या बाजूच्या श्रीमाताजींच्या आराम कक्षात केक कापण्यात आला.

दिनांक २१.३.२००४

आजच्या वाढदिवसाच्या पुजेच्या प्रसन्न दिवसाची सुरवात सकाळच्या ६.३० च्या सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर दुपारी ११.३० च्या सुमारास रोजच्या सारखे ध्यानाच्या गहनतेचा कार्यक्रम साधारण तासभर झाला.

सकाळी बाहेरच्या बाजूला लहान मुलांसाठी चित्रकलेची स्पर्धा घेण्यात आली होती. त्यामध्ये भाग घेतलेल्या सर्व मुलांना रंगपेट्या प्रेझेंट देण्यात आल्या.

संध्याकाळी ६.०० वा. पासूनच पेंडॉल पुर्णपणे खच्चून भरुन गेला होता. पेंडॉल बाहेर २-३ हजार सहजयोगी पेंडॉलमधे जागा न मिळाल्याने बाहेरच्या टी.व्ही. स्क्रीनवर, एल.सी.डीच्या मोठ्या स्क्रिनवर पूजा सोहळा पहात होते. साधारण ७.४५ वा. सहजयोगी गायक कलाकारांनी भजने सादर केली. प्रत्येक कार्यक्रम स्क्रीनवर दिसत होता. गायक कलाकारांनी '' बिनती सुनिये आदिशक्ती मेरी, नमामी श्रीगणराज दयाळा, छिंदवाडामे जनम लिया, मेरी माँ पुनमका चांद, आखें बंद करु या खोलू, जब रात ढले, पवन झकोरा लाया रे संदेशा श्री माँकि आनेका, ही प्रसिध्द भजने गाऊन वातावरण चैतन्यमय केले होते.

साधारण ९.०० च्या सुमारास सनईचा मंगल धून सूरु झाली आणि श्रीमाताजींच्या आगमनाची सूचना केली गेली.सर्व योग्यांची उत्कंठा शिगेला पोचली आणि पाठोपाठ फटाक्यांची आताषबाजी आकाशांत कारंजासारखी पसरू लागली.श्रीमाताजी साधारण १०.०० च्या सुमारास स्टेजवरील सिहासनावर स्थानापन्न झाल्या.

श्रीमाताजींची अमृतवाणी सुरु होण्याआधीं काही मिनिटे सबंध मंडप नि:शब्द शांततेत बुडाला आणि सर्वांच्या नजरा कृतज्ञतेने आदिशक्तीच्या चरणांवर स्थिरावल्या.

आपल्या प्रेमाने ओथंबलेल्या अमृतवाणीमधे श्रीमाताजी म्हणाल्या

*''तुम्ही लोकांनी इतके कष्ट घेऊन माझ्यासाठी केलेल्या या स्वागत समारंभाबद्दल मी तुमची खूप खूप आभारी आहे. तुम्ही उत्साह व उल्हास पूर्वक साजरा केलेल्या आजच्या समारंभाचे मला खूप कौतुक वाटते.*

*माझे एवढया प्रेमाने तुम्ही स्वागत केले आहे म्हणून मी तुमची ऋणीच आहे. तुमचे कोणत्या शब्दांत आभार मानू हेच मला समजेनासे झाले आहे; त्या आभारांसाठी माझ्याजवळ शब्दच नाहींत. आजचा हा प्रसंग इतका आनंद देणारा आहे की माझे हृदय भरुन आले आहे. माझ्या भावना शब्दात व्यक्त करणेही अशक्य आहे. मला कांहींच सुचेनासे झाले आहे. एवढे आदरातिथ्य करुन तुम्ही माझीच कुचंबणा का करता? तुम्ही सर्वांनी सहजयोग स्वीकारला आणि त्याच्यासाठी इतके श्रम घेत आहांत याबद्दल मी तुमचे आभार मानते.*

*आणखी कांही बोलणेंच मला अशक्य आहे. सहजयोगी म्हणून तुम्ही इतकी मेहनत घेतली आहे की तुमचे शब्दांमधून कौतूक करणेही मला जमण्यासारखे नाहीं. परमेश्वराचे तुम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद. सर्वांचे मी पुन्हा एकदा आभार मानते.तसेच या कलाकारांना तुमच्या मनोरंजनासाठी कार्यक्रम सुरु करण्यास मी विनंति करते.''*

त्यानंतर प्रत्यक्ष पूजेमधे २१ लहान मुलांनी श्रीमाताजींच्या चरणांची पूजा केली. त्यावेळी ''हेमजा सुतम भजे, नमोस्तुते नमोस्तुते, ही भजने झाली.ओटी भरताना, ''तेरे ही गुण गाते है, अनादी निगुणी प्रगटली भवानी, ए गिरी नंदीनी, शेवटी विश्व वंदिता निर्मला माता'' ही भजने झाली.

रात्री १२ च्या सुमारास श्रीमाताजी व सर सी.पी.श्रीवास्तव साहेबांसाठी असे दोन केक कापण्यात आले.त्यानंतर श्रीमाताजींना भेटी अर्पण करण्याचा कार्यक्रम पार पडला. सर्व उपस्थित योग्यांना परमावधीचा आनंद व चैतन्याचा लाभ झाला. सर्वांना पुन्हा एकदा श्रीमाताजींनी आशीर्वाद दिला व रात्री १२.३० वा सर्व कार्यक्रम संपवून चैतन्याचा महाप्रसाद घेऊन सहजयोगी परत निघाले.



# स्वत:ला ओळखा

प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचेप्रवचन

आत्मा 'बनणे' हेच मानव जन्माचे सार्थक आहे. त्यातूनच जीवनवृक्ष बहारणार आहे.

आपण जर खरे साधक असाल तर प्रत्येकाने त्याबद्दल प्रामाणिक असले पाहिजे आणि स्वत:बद्दल जागरुक राहून आपल्या मानवजन्माचे चीज केले पाहिजे. कर्मकांण्ड, ध्यान, जप-तप, भक्ति व ज्ञानसंपादन अशा वेगवेगळ्या वाटा सांभाळणारे साधक असतात; पण ते करताना आपण काय मिळविले आहे याचा शोध प्रत्येकाने घेतला पाहिजे. एक माता म्हणून साधकांना मी विचारेन," अरे बालका, इतके कष्ट करून तूं काय मिळवलेस'. तुला अंतिम सत्य सापडले कां? पुराणांत वर्णन केलेल्या सिध्दांन्तांची प्रत्यक्ष अनुभूति तुला मिळाली कां?"

नामदेवांसारखा साधा शिंप्याचे काम करणारा संत गोरा कुंभार या संताला भेटायला गेला आणि त्याच्याकडे पाहिल्याबरोबर त्याच्या तोंडातून "निर्गुणासी भेटी आलो सगुणासी" अशा अद्वितीय काव्य पंक्ती बाहेर पडल्या. एक साक्षात्कारी संतच दुसऱ्या साक्षात्कारी संताचे असे वर्णन करु शकतो. आत्मसाक्षात्कार मिळाल्यावरच मानवाला आपल्या मान्वजन्माच्या पलीकड्चे सत्य समजते. ख्रिश्चन धर्मातील थॉमस या धर्मोपदेशकानें भारतात आल्यावर खूप ग्रंथरचना केली. पण ते सर्व साहित्य ईजिप्तमधें गुहांमधे गुप्त ठेवण्यांत आले, अनेक वर्षे उलटल्यावर त्याचा शोध लावून अभ्यास केल्यावर असे दिसून आले की त्याने जवळ-जवळ सहजयोगच सांगितला आहे आणि अंतिम सत्य प्रत्यक्ष अनुभूतीनंतरच समजणार आहे हेहि सांगितले आहे.

प्रत्येक शास्त्र "आधी स्वत:ला ओळखा" असेच सांगते. मी कोण आहे हे समजण्यासाठी आपल्यामधील आत्मा जाणावा लागतो. माणूस नेहमीं 'माझा देह, माझे नाक, माझा देश' ......असे सारखे माझे -माझे करत राहतो. पण 'माझे 'असा विचार करणारा खरोखर कुठें असतो? हा 'मी' आपल्या हृदयात प्रतिबिंबित असतो. सुरवातीला हे एक गृहीत समजा; पण ते समजल्यावर, जाणल्यावर व त्याचा अनुभव आल्यावर प्रामाणिकपणे त्याचा स्वीकार करायला हवा. पश्चिमात्य लोकांना हे समजायला थोडे कठीण वाटते; पण एकदां त्याचा अनुभव आल्यावर ते विद्यापीठ, ग्रंथालये वगैरे ठिकाणी जाऊन, ग्रंथांचा अभ्यास करून, संशोधन करु न कुण्डलिनीची सर्व माहिती काढतात. नाथपंथातील साधूंनी कुण्डलिनी जागृतीवर खूप कार्य केले. पण त्याचे बरेचसे संदर्भ आता उपलब्ध नाहींत. जर्मन लोकांनी पण खूप प्रयत्न केले पण दुर्दैवानें तांत्रिकांनी त्यांना चुकीची माहिती दिली; त्यांच्या एका पुस्तकांत तर कुण्डलिनी पोटांत आहे असे म्हटले आहे.

परमात्म्याच्या (Divine) साधनेमधें तीन प्रकारच्या पद्धती दिसून येतात. एक म्हणजे वेदाभ्यास. विद् याचा अर्थच जाणणे. त्याच अर्थाने ख्रिश्चन धर्मात ज्ञानी पंडितांना Gnostics म्हणतात. या ज्ञान शब्दामधे मानसिक किंवा भावनिक पातळीवरचे ज्ञान असा अर्थ नसून

त्याच्याही पलीकडडील सूक्ष्म ज्ञानाचा अंतर्भाव आहे. वेदांमधें पाहिल्यांदाच म्हटले आहे की हे तुम्ही जाणले नसेल - म्हणजे तुमच्यामधील मज्जासंस्थेमधून याची प्रचीति आली नसेल तर पुढें वाचण्याचा कांहीं फायदा नाहीं. मानव म्हणून आपण अजूनही अपूर्ण आहोत हे नम्रपणांने प्रत्येकाने मानले पाहिजे. तसे नसते तर मग लोकांमधें भांडणे, युध्द, मारामाऱ्या कां होतात? पर्यावरणाचे, अर्थिक स्थितीचे वा राजकारणासंबंधी प्रश्न कां निर्माण होतात? याचा विचार केला की मानवजन्माच्या मुळाशी आपन पोचू; मानव असा कां वागतो हे समजेल. पशू सदैव परमेश्वराच्या नियंत्रणाखाली असतात. पण माणसाला स्वातंत्र्य मिळाले असल्यामुळे तो स्वत:च्या मर्जीनुसार वागून भरकटत जातो. खरे ज्ञान, अर्थात आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न मानवाने केला पाहिजे. वेद काळांत ऋषींनी निसर्ग आणि पंचमहाभूतांना समजून घ्यायचा प्रयत्न केला. आमच्या दृष्टीने हे उजव्या बाजूचे कार्य व प्रगति आहे. ग्रीक संस्कृतीमधें अशीच प्रगति होती. भक्तिप्रधान मार्गामधें डावी बाजू अधिक प्रभावशाली होते; लोक अंधविश्वास ठेवून देव मानूं लागले. भारतामधे अनेक संतांनी कार्य केले हे आपले भाग्य आहे पण त्यांच्या शिकवणुकीतही चुकीचे भाग घुसवल्यामुळें प्रगति थंड झाली. भारतातील आणखी एक चांगली गोष्ट म्हणजे धर्माची संघटित अशी रचना नव्हती; तरीही सर्व शास्त्र व वेदांवर एक प्रकारच्या मायेच्या प्रभावाखाली सावट आले.; त्यांतून आर्य-समाजासारख्या संस्था उदयास आल्या आणि लोक आणखीच भ्रमांत आले. या लोकांना उद्दिष्टापर्यंत जाता आले नाहीं.कारण जे वाचले तेवढ्यावरच ते संतुष्ट राहिले. कबिर म्हणूनच म्हणतात, 'पढिये, पढिये पंडित मूरख बने' नुसत्या वाचनाने अंतिम सत्य सापडत नाहीं. डॉक्टरने जरी तुमच्या आजारावर औषध लिहून दिले तरी औषध तुम्हालाच घ्यायचे असते. वेदांनी व उपनिषदांनीही हेच सांगितले आहे की सत्य (आत्मा) तुमचा तुम्हालाच जाणला पाहिजे. पतंजलीयोगांतही योगासनांचा थोडासाच भाग आहे. सहजयोगांतही आपण कांहीं क्रिया करतो पण ते कांहीं विशिष्ट त्रास दूर करण्यासाठीं.सहजयोगांत साधक शारीरिक-मानसिक-भावनिक यांच्या पलीकडे आत्मिक (Spiritual) व्यक्ति असतो.

आतां भक्तिमार्ग पाहिला तर पूजा - अर्चा, मंदिरात जाणे इ. प्रकार आढळतात. पण त्याची महति पण कमी - कमी होऊ लागली आहे. भक्ति म्हणजे काय ? श्रीकृष्ण माता नव्हते पण चतुर होते. त्यांनी सरळ - सरळ सांगितले तर आवडणार नाहीं म्हणून लोकांनाच सत्य शोधून काढायला सांगितले. अर्जुनालाच फक्त त्यांनी सर्व उपदेश केला; ते म्हणाले कीं प्रथम ज्ञान- प्रत्यक्ष मज्जासंस्थेमधून जाणवणारे ज्ञान- हवे; मग भक्ति केली पाहिजे. त्यामधे फळ, फूल, पाणी कांहीही अर्पण केले तरी चालेल. पण त्यामागे अनन्य भक्ति हवी. अनन्य म्हणजे, दुसरा कोणी नाही. हे साक्षात्कारी माणसालाच समजेल. परमात्म्याशी संबंध आल्याशिवाय भक्ति कशी होणार?

पुष्कळ लोकांना वाटते की आपण एवढे उपास-तापास, जप-तप करतो तरी आपले त्रास कमी होत नाहीत. पण त्यात देवाची चूक नाहीं कारण देवाशी तुमचे संधान जुळलेले नसते. टेलिफोनची तार जर जोडलेली नसेल तर टेलिफोन कसा होणार? त्याप्रमाणे भगवंताबरोबर संधान जुळल्याशिवाय खरी भक्ति होंउच शकत नाहीं. म्हणूनच श्रीकृष्ण म्हणाले,'' योगक्षेमं वहाम्यहम्।'' -आधी माझ्याबरोबर योग मिळवा म्हणजे मग मीच तुझें सर्व कल्याण करेल. कर्माबद्दल ते म्हणाले की कर्म करत रहा पण ती सर्व माझ्या चरणी अर्पण कर. पुष्कळ लोकांना कांहीही कर्म केले (खून सुद्दा) तरी ते कृष्णार्पण केले की मी सुटलो; पण ही केवळ मनाची कल्पना आहे; त्या स्थितीला आल्याशिवाय हे घडत नाहीं.आता सहजयोगी 'मी कुण्डलिनी जागृत केली' असं म्हणणार नाहीं तर 'कुण्डलिनी वर आली' असे म्हणेल; म्हणजे तो स्वत: कार्य करीत असला तरी तृतीयपुरुषी भाषाच बोलेल. असे कर्म आपोआपच श्रीकृष्णार्पण होते. कर्ता- करविता तोच आहे आपण फक्त माध्यम असतो. असे झाले म्हणजे सहजयोग जमला.

तुमच्या सर्वांमधे ही शक्ती आहे. कांहीं ग्रंथांमधे कुण्डलिनी जागृतीचे भयानक परिणाम होतात असे वर्णन केले आहे; पण ते साफ चूक आहे. मी जगभर हे कार्य करत आहे आणि अनेकांना कुण्डलिनी- जागृतीची अनुभूति

मिळाली आहे, पण कुणालाही कसलाही त्रास झाला नाहीं, उलट त्यांच्यांत अनेक सुधारणाच झाल्या आहेत., अनेकांना दारु, ड्रग अशा व्यसनांपासून मुक्ति मिळाली आहे. कांहीं लोकांची तर एका रात्रींत व्यसने सुटली आहेत.मी त्यासाठी वेगळे असे काहीच करीत नाही तर तुमची स्वत:ची कुण्डलिनी जागृत झाल्यावर हे कार्य करते. ती तुमची वैयक्तिक आई आहे आणि तुमची सर्व माहिती, अगदी टेप करावी,तशी तिच्याजवळ आहे. साडतीन वेटोळे घालून ती तुमच्या मूलाधारांत असते. ती जेव्हां जागृत होते तेव्हां तिला वर येतांना काहीं कष्ट होतात तेव्हा थोडी उष्णता निर्माण होते; विशेषत: ज्याचे लिव्हर बरोबर काम करत नसते त्यांना अशी उष्णता जास्त जाणवते. ही कुण्डलिनी शक्ति म्हणजेच शुध्द इच्छा. अर्थशास्रात सांगितले जाते की सामान्यत: माणसाच्या इच्छा कधींच तृप्त होत नाहींत. आज घर हवे तर उद्या गाडी हवी. मग विमान ......हे चालूंच राहते, जी गोष्ट जवळ नसते ती मिळवण्याचा आपण ध्यास घेतो. पण तीच गोष्ट हांतात आल्यावर तिच्यापासून आनंद मिळू शकत नाहीं. पण ही इच्छा म्हणजे परमेश्वराच्या सर्वव्यापी प्रेमशक्तीशी योग मिळवण्यची शुध्द इच्छा आहे . निसर्गात सगळीकडे सृजनशीलता आढळते; सुंदर फुले ., गोड फळे, लहानशा बीजामधून वाढणारा मोठा वृक्ष हे च दाखवतो. एखाद्या कॅमेऱ्यासारखे काम करणारे आपले डोळे कसे व कुणी बनवले असतील? आपल्याला मानव जन्मापर्यंत उन्नत करणारी शक्ति कोणती? विज्ञानातून ही उत्तरे मिळण्यासारखी नसल्यामुळे आपल्यालाच ती शोधून काढावी लागतात. ही शक्ती म्हणजेच परमेश्वराचे सगळीकडे पसरलेले ब्रम्हचैतन्य. ही शक्ती जाणणे व त्याची प्रचीति अनुभवणे हे तुमच्या स्वत:वर अवलंबून आहे; ते नाकारणे म्हणजे परमचैतन्याशी योग करुन घेण्याची संधि नाकारणे. या जिवंत शक्तिमुळेंच आपण मानव स्थितीपर्यंत उन्नत होत आहो आहोत. ती शक्तीच सर्व काहीं घडवते., निर्माण करते आणि प्रत्येक वस्तूमात्र चैतन्यमय बनवते; तीच तुमच्याबरोबर किती रहायचे हे ठरवते. प्रत्येक अणू-रेणूमधें व प्रत्येक जिवंत वस्तूमात्रामध्ये ती व्यापून आहे. तिचे कार्य इतक्या हळुवारपणे व सूक्ष्मपणे चालते की एरवी आपल्याला तिची चाहूल लागत नाही. कळीचे सुंदर फूल कसे व कधीं उमलते आपल्या लक्षांतही येत नाहीं. अर्थात म्हणूनच तिच्या अस्थित्वाची जाण आपल्याला होत नाहीं.

जोपर्यंत आपला या सर्वव्यापी शक्तीशी योग होत नाहीं तोपर्यंत आपल्याला अंतिम सत्य समजणार नाहीं; कारण हे झाल्याशिवाय आपल्या अंतरंगातील आत्मा आपल्या चित्तमधे उतरत नाहीं. कुंण्डलिनी जागृत होऊन षट्चक्रांचे भेदन करुन टाळूमधून बाहेर पडत नाहीं तोपर्यंत आत्म्याचा प्रकाश आपल्या चित्तामधें पडत नाही. एकदा आत्म्याचा प्रकाश चित्तामधें प्रगटला आणि आपल्या नसानसांमधून पसरुं लागला की आपण त्या सामूहिक चेतनेशी जोडले जातो. म्हणूनच मग दुसऱ्या व्यक्तीची कुण्डलिनी व चक्रांची स्थिती तुम्हाला हाताच्या बोटावर कळते. या सात चक्रांची स्थाने दोन्ही हातांच्या तळव्यांवर व बोटांवर आहेत आणि त्यांच्यावरच्या संवेदनांवरुन तुम्हाला दुसऱ्याची स्थिति जाणवते.डाव्या बाजूंवरील चक्रांमधून भावनिक बाजू तर उजव्या बाजूंवरील चक्रांमधून कार्य-विचार स्थिति जाणवते. डॉक्टर जेव्हां रोगी तपासतो ते वृक्षाच्या फांद्या-पानांवर उपाय करण्यासारखे असते, वृक्षाला जर शक्ति द्यायची असेल तर त्याच्या मुळांना पाणी घालावे लागते. आपला आत्मा हा त्या मुळासारखा आहे व आपले जीवन त्या वृक्षासारखे आहे.

मोहम्मदसाहेब सुध्दा म्हणाले होते की 'कियामा(पुनरुधार Resurrection)च्या वेळीं तुमचे हात बोलतील;आणि तेच तुमच्या विरोधात साक्ष देतील' सर्व अवतारी पुरुष या समयाबद्दल बोलले आहेत; त्याला लास्ट जजमेंट असेही म्हटले आहे आणि कलियुगांतच ही महान घटना घडणार आहे असेही सांगून ठेवले आहे. पण त्यासाठी किती लोक तयार आहेत? हजारोंनी लोक सत्याचा मार्ग सोडून भलतीकडे भरकटत आहेत. हे समजण्यासाठीही माणसाच्या बुध्दीमधें प्रकाश यायला हवा. त्या दृष्टीने रशियाची स्थिति फार चांगली आहे ते अंतर्मुख होऊन स्वत:कडे पहातात. एका ठिकाणीं तर वीस हजाराहून जास्त सहजयोगी असल्याचे मी पाहिले . मी तिकडे गेले होते तेव्हां तिथें उलथापालथ झाली होती; पण ते सहजयोगी शांत दिसले आणि मला म्हणाले,'माताजी आम्ही शांत आहोत, कारण आम्ही परमेश्वराच्या साम्राज्यात आहोत. हा आतां

आमचा देशच नाहीं'

भारतामधील लोक फार कण्डिशन्ड असतात. आपल्यासमोर बरेच आदर्श असतात. पण आपण त्यांचे अनुकरण करण्यांत कमी पडतो. इथले लोक रामाला किंवा एखाद्या गुरूला खूप मानतील पण आंतमधून सर्व पोकळ. ते पूर्वापार चालत आलेल्या प्रथांनाच चिटकून बसतील. पण स्वत:कांहीं मिळवण्याचा प्रयत्न करणार नाहींत. सहजयोग घेऊन तुम्ही स्वत:ला जाणल्याशिवाय तुम्हाला राम समजणार नाहीं. मी नुकतेच एक भयानक पुस्तक पाहिले, त्यात राम, कृष्ण, ख्रिस्त असे प्रत्यक्षाम्त कुणीच नव्हते असे लिहिले आहे ! असे म्हणणेंच अशास्त्रीय आहे, स्वत; पडताळा घेतल्या शिवाय असे कोण म्हणू शकतो? समजा मी मद्रासला कधीं गेलेच नाहीं तरीही मद्रासबद्दल बोलू लागलेतर तुम्ही काय म्हणाल? त्याचप्रमाणे लोक परमेश्वराबद्दल बोलतात वा लिहितात, कारण कायद्यानुसार तसे करण्याला प्रतिबंध नसतो. म्हणून वाट्टेल तसे लिखाण करतात. सत्य समजल्याशिवाय खरा गुरु कोण हेहि ओळखणे अशक्य आहे. पण आत्मज्ञान झाल्यावर कुणालाही विचारायची जरूरच रहात नाहीं; आत्मा हेच अंतिम सत्य आहे.

आपल्याकडील तिसरा मार्ग म्हणजे नाथपंथ. जैन शिकवणुकीमधें आदिनाथ मानतात, त्यांच्या प्रमाणे एक गुरु एका शिष्यालाच ज्ञान देतो. जनकही नचिकेतलाच मानायचा. बाराव्या शतकांत ज्ञानेश्वर आले; त्यांचा गुरु म्हणजे त्यांचाच मोठा भाऊ; त्या भावंडांचे खूप हाल झाले. त्यांनी गुरु जवळ परमात्म्याचे ज्ञान-सर्वसामान्यांना सोप्या व प्राकृत भाषेंत करून देण्याची अनुज्ञा मागितली; कारण मार्कंडेय ऋषींनी तेरा-चौदा हजार वर्षापूर्वी लिहून ठेवलेले कुण्डलिनीचे ज्ञान संकृत भाषेत होते व ती भाषा सर्वसामान्यांना अवगत नसल्यामुळें ते ज्ञान एक प्रकारे गुप्त व गूढ स्वरूपांत बंदिस्त होते. म्हणून त्यांनी भगवद् गीता विस्तारित सोप्या व काव्यमय भाषेंत पुन्हा लिहिली. त्यातला सहावा अध्यायांत कुण्डलिनीचे सर्व वर्णन आहे. तरीहि कर्मठ लोकांनी निषिध्द मानून त्याचे पठण करण्यास मनाई केली.म्हणून ते ज्ञान पुन्हां गुप्तच राहिले. गुरु नानक, संत कबीर हेहि नाथपंथीयच. नानकांनी 'खलीस' हा शब्द वापरला., त्याचा अर्थ शुध्द, निर्मल असाच आहे व सहजयोगही निर्मलधर्मच आहे. सहजयोगांत हिंसेला स्थान नाहीं. तिथे फक्त प्रेम आहे. हे प्रेम निर्व्याज पाहिजे; त्याची परतफेड नसते व ते अमर्याद आहे; त्याच्यांत कसलाही भेदभाव नाहीं. झाडांच्या मुळातील जो पोषण-रस पाना फुलांच्या टोकापर्यंत पोचतो आणि फिरून पुन्हा परत मूळांत येतो तसे हे प्रेम असते. आपण हे समजून घेतले पाहिजे की पृथ्वीवर अवतरलेले सर्व संतमहात्मे , ऋषी व प्रेषित हे या समस्त मानव जीवन वृक्षाच्या पोषणासाठींच आले. म्हणून त्यांच्यातही भेदभाव न करतां सर्वांना मान-आदर दिला पाहिजे. हे सर्व मानवाच्या उन्नतीचेच कार्य आहे. त्यांतील शेवटची पायरी म्हणजे सहजयोग आहे.

माणसाची मुख्य अडचण म्हणजे त्याचा अहंकार व प्रति-अहंकार. या दोन प्रवृत्ति फुग्यासारख्या फुगत जातात आणि त्यांचा प्रभाव अति झाला की माणूस असंवेदनशील (Closed Persanolity) बनतो. कुण्डलिनी आज्ञा चक्र पार करतांना हे दोन फुगे खेचून घेते व आज्ञाचक्राचा मार्ग मोकळा करून सहस्रारांत येते.ही सर्व जिवंत क्रिया आहे; कुंण्डलिनी ही जिवंत शक्ति अतिशय हळूवारपणें आपले कार्य करते. सहस्राराचे(ब्रह्मरंध्राचे)जेव्हा ती भेदन करते त्यावेळेस आपण सदाशिवांचे चरणापाशी पोचतो आणि ते आपल्या चित्तामधें उतरतात; आपले चित्त प्रकाशित करतात. मग हेच चित्त अतिशय सूक्ष्म व कार्यशील बनते आणि आपल्याला सामूहिक चेतनेमधें उतरवते. ज्यामुळे तुम्ही इतरांची चक्रे जाणूं शकता; त्यांना सुधारण्यासाठीं मदत करुं शकता; नवीन लोकांना जागृति देऊं शकता. एका अर्थाने निर्विचार होऊन तुम्ही सामूहिक चेतनेमधून कार्य करू लागता. एखाद्या कलाकृतीसमोर नुसते हात जरी केले आणि ती कलाकृति निर्माण करणारा साक्षात्कारी असेल तर हातांवर तुम्हाला चैतन्य जाणवते. त्याचप्रमाणें हे प्रकाशित चित्त तुमच्या स्वत:च्या चक्रांमधील दोष वा अडथळे तुम्हाला दाखवते. सामूहिकतेमधें असणे याला सहजयोगांत म्हणूनच महत्त्व असते. सामूहिकतेमधें ध्यानामधें आपली चक्रेही सुधारत असतात.

कुण्डलिनीने आज्ञा चक्र पार केले की तुम्ही निर्विचार होता. एरवी मनांत एक विचार येतो आणितो संपण्याच्या आधींच दुसरा विचार येतो आणिहे चक्र सतत चालू राहते.त्यांत कांहीं विचार भूतकाळ तर कांही भविष्य

काळासंबंधी असतात. पण वर्तमान क्षण महत्वाचे आहे आणि नेमके हेच कुण्डलिनी तुमचे चित्त आंतमधे खेचून घडवून आणते; ब्रह्मरंधाचे भेदन होत असतानाच्या स्थितीला 'विलंब' म्हणतात; हा विलंब वाढला (दोन विचारांमधले अंतर)की तुम्ही वर्तमानांत येता आणि सहज-निर्विचार स्थितीला पोहचता. गहनता मिळवण्यासाठी या स्थितीमधें अधिकाधिक स्थिरावले पाहिजे. ध्यानामधून हे मिळवता येते.

अंतिम सत्य कधीं विकत घेता येत नाहीं; परमेश्वराजवळ पैसा हा शब्दच नाहीं; त्याने पैसा निर्माण केलाही नाहीं, ही माणसानेच निर्माण केलेली डोकेदुखी आहे. सहजयोगाच्या कार्यक्रमाला हॉल घेतला तर त्याचे भाडे द्यावे लागते. म्हणजे पैसा हॉलसाठी लागतो, देवासाठीं नाहीं. कुण्डलिनी- जागृति व आत्मसाक्षात्कारासाठीं पैसा लागत नाहीं. परमात्म्याला भेटण्यासाठीं आधी आत्म्याशी भेट व्हावी लागते. मानवी जीवनाचे सार्थक हा आत्मप्रकाश सगळीकडे पसरवण्यातच आहे; चित्तामधें प्रकाश आला की ते कार्यक्षम व प्रभावशाली बनते. आत्मा सदैव सत्यच सांगतो व दाखवतो. आत्म्याबरोबर संपूर्ण योग मिळाला की निर्विकल्प स्थिति मिळते. त्यावेळेस चित्त पूर्णपणें प्रकाशित होते. आणि त्याचा प्रभाव पडतो; त्यावेळेस व्हायब्रेशन्स तुम्हाला सत्यच सांगतात; तुमच्या सर्व प्रश्नांची अचूक उत्तरे मिळतात; नुसते 'शिव'वा 'राम' अशी नांवे जरी घेतलीत तरी थंड थंड चैतन्य जाणाल. म्हणजेच तुम्ही परमेश्वराच्या साम्राज्यात येता. तुमची पुरेपूर काळजी घेतली जाते व तुम्हाला सर्व तऱ्हेने संरक्षण मिळते.

आत्म्याचा आणखी एक गुण म्हणजे प्रेम; म्हणूनच तुम्हाला आनंद व समाधान मिळते. हेच आजकालचे महा-विज्ञान आहे.हीच भारतीय संस्कृति आहे व हाच आपल्या सर्वांचा अमोल ठेवा आहे. गुरु नानकसाहेबांनी हाच सहजयोग 'सहज समाधी लागो' या शब्दांत सांगितला. सर्व संतांनी हाच उपदेश केला. आत्मा बनणें हेच आपल्या मानव जन्माचे सार्थक आहे. त्याचाच आपण सर्वांनी निश्चय करू या.

परमेश्वराचे सर्वांना अनंत आशीर्वाद.

●●●

## सहज समाचार

**सहजयोग सेमिनार महाविर हॉल वणी**

दिनांक १ फेब्रुवारी २००४ रोजी वणी येथिल महाविर भवनात एक दिवसाचे सेमिनार आयोजीत केले होते. त्यासाठी वणी परिसरातील साधारण १५०० सहजयोगी उपस्थित होते. त्यामध्ये अनेक जेष्ठ सहजयोग्यांनी मार्गदर्शन केले. श्री कर्नल माने यांनी सहजयोगाची माहिती देऊन ध्यानाची आवश्यक्ता याबाबत आपले विचार मांडले. श्रीमती माधूरी माने यांनी सहजयोगाचा प्रसार-प्रचार व कुंकु का लावायचे तसेच सहजयोग व संगीताचा संबंध याबाबत माहिती दिली.श्रीमती माधूरी राशिनकर यांनी सहजयोगाच्या २१ पायऱ्या ह्या विषयी आपले मत मांडले.त्यामध्ये त्यांनी झाडाला जसे पाणी दिले नाही तर ते सुकते त्याप्रमाणे ध्यानाशिवाय आपली स्थिती होते.

अमरावती सहजयोग केंद्राचे प्रमुख डॉ ऊधवानी यांनी सुक्ष्मता, सहजयोग व आरोग्य हा विषय माडला, तसेच आपण जितके सुक्ष्मतेत उतरू तितके आपल्या आत्माचे परमात्माशी मिलन सोपे होईल.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री गजानन कालावार यांनी केले तर आभार केंद्रप्रमुख श्री प्रमोद मामीडवार यांनी केले.

**इचलकरंजी पब्लिक प्रोग्राम**

फेब्रुवारी २००४ च्या शेवटच्या आठवड्यात इचलकरंजी केंद्रातर्फे सहजयोगाचे अनेक ठिकाणी पब्लीक प्रोग्राम घेतले. त्यासाठी श्रीरामपूर , कोपरगांव येथिल युवाशक्तीने तसेच श्री अशोक चव्हाण, प्रा. नितीन पवार, श्री के.के.आव्हाड यांनी सहकार्य केले. दिनांक २७,२८ व २९ फेब्रुवारी २००४ रोजी सदर पब्लीक प्रोग्राम इचलकरंजी, हुबळी, हातकणंगले व कोल्हापूर परिसरात आयोजित केले होते. त्यामध्ये साधारण ६०००-६५०० जणांनी जागृती घेतली. २९.२.२००४ रोजी दुपारी ३.०० ते ६.०० या वेळात श्रीमाताजींच्या प्रतिमेची शोभायात्रा आयोजीत केली होती. त्यामध्ये परिसरातील ५०० सहजयोग्यांनी भाग घेतला होता.

# सहजयोग सेमिनार ( कार्यशाळा)  निगडी पुणे, १८ एप्रिल २००४

प.पू.श्रीमाताजीच्या आशीर्वादाने रविवार दि. १८.४.२००४ रोजी पिंपरी-चिंचवड प्राधिकरणातील हॉलमध्ये सहजयोग्यांच्या मार्गदर्शनासाठे एक दिवसाचे शिबीर (कार्यशाळा)आयोजित केले होते. सकाळी ९.४५ वा. कार्यशाळेची सुरवात तीन महामंत्र व श्रीबागडदे व सहकारी यांच्या भजनाने झाली. भजनांनंतर ओंकार, सहजयोग व संगीत याबद्दल त्यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. त्यानंतर नारायणगांवचे श्री गायकवाड यांनी सहजयोग प्रसार व प्रचार याबद्दल आपले विचार व्यक्त केले.

यानंतर सौ पित्रे यांनी आपल्या भाषणांत सहजयोगातील ४ या आयांम (4th Dimension )व त्यानंतर Last Judgement,.(अंतिम निर्णय) यावर मौलिक असे भाष्य केले. श्री निंबाळकर यांनी सहजयोगात सर्वांगाने प्रगती होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी यावर आपले विचार व्यक्त केले.नंतर डॉ.गजरे यांनी आदर्श सहजयोगी व सहजयोग्यांसाठी आचारसहिता (Protocols ) यावर मार्गदर्शन केले व त्यानंतर भोजनासाठी पहिले सत्र संपले.

दुपारच्या सत्राची सुरवात २.३० च्या सुमारास पुण्याचे केंद्रप्रमुख श्री राजेंद्र पुगालिया यांच्या भाषणाने झाली.त्यांनी आपल्या भाषणात सहजयोग्यांच्या अंगी असणाऱ्या शक्तीचा योग्य वापर , सहजयोगाच्या वाढीसाठी प्रसार-प्रचार किती आवश्यक आहे व तो योग्य तऱ्हेने घडावा यावर आपला भर दिला. नंतर राजस्थान सेंटरचे लिडर श्री भगवतीसिंग यांचा त्यांच्या हस्ते सत्कार केला. डॉ घूले यांनी 'सहजयोग व आरोग्य' या त आरोग्याचा वचक्रांच्या चैतन्यशक्तीचा मेळ कसा ठेवावा यावर उपयुक्त असे मार्गदर्शन केले. यानंतर सौ माने यांनी सहजयोगातील महिलांचे कार्य आणि वृषाली देशपांडे हिने युवाशक्तीचे महत्व यावर भाष्य केले. नंतर श्री डहाळे यांनी ध्यानाच्या २१ पायऱ्याबाबत माहिती दिली.

शेवटी श्री नरके यांनी कॅण्डल ट्रिटमेंट व मीठपाणी याची प्रात्यक्षिकासह माहिती दिली.शेवटी सहजयोग्यांच्या शंकांच्या प्रश्न -उत्तराचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी पुणे शहर वपरिसरातील १२००-१३०० सहजयोगी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्र संचलन कर्नल माने यांनी केले. शेवटी चहापानाने कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यशाळेमुळे उपस्थित सहजयोग्यांना बहुमोल माहिती व मार्गदर्शन मिळाले. तसेच कार्यशाळा विनामुल्य आयोजित करण्याबाबत सुरवात झाल्याबद्दल सर्वांनी संयोजकांचे आभार मानले.

ही कार्यशाळा विनामुल्य होती. अशाच प्रकारच्या विनामूल्य कार्यशाळा दुसरीकडे आयोजित होण्याबद्दल श्रीमाताजींच्या चरणी सर्वांनी प्रार्थना केली.



तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ।।
करूनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ।।

# प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवी - सर सी. पी. श्रीवास्तव साहेब
# विवाह वाढदिवस समारंभ प्रतिष्ठान, पुणे: ७ एप्रिल २००४










# १५ एप्रिल २००४, प्रतिष्ठान कार्यक्रम क्षणचित्रे





